शुक्रवार, १२ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 12 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-245 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# पेचातले सरकार वाचले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षातला महत्त्वाचा अध्याय गुरुवार लिहिला गेला. राज्यासह संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या शिंदे-फडणवीस सरकारच्या वैधतेचा अंतिम निकाल समोर आला असून कायदेशीर पेचात अडकलेले शिंदे-फडणवीस सरकार थोडक्यात वाचले आहे. तत्कालीन उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी अपात्र ठरवलेल्या 16 आमदारांबाबत सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय दिला असून सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण विधानसभा अध्यक्षांकडे सोपवले आहे. आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे या आमदारांचा निर्णय घेणार असल्यामुळे ते आमदार पात्रच असल्यात जमा आहेत. त्यामुळे ठाकरे गटाला मोठा झटका बसला असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने एकमताने हा निकाल दिला. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी हा निकाल वाचून दाखवला. सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठात न्यायमूर्ती एम. आर. शाह, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली, न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा यांचा समावेश आहे.**



सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी ठाकरे विरुद्ध शिंदे सत्ता संघर्षाबाबत मोठा निकाल आहे. तसेच, राज्यपालांच्या भूमिकेवर ताशेरे आणि उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाचा दिलेला राजीनामा याबद्दलही मोठी वक्तव्य केली आहेत. जर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता, तर सरकार परत आणले असते, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याभूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. राज्यपालांपुढे बहुमत चाचणी बोलावण्यासारखी वस्तुनिष्ठ स्थिती नव्हती. कोणत्याही पक्षात अंतर्गत दुफळी निर्माण झाली असली, तरी राज्यपालांनी त्या राजकीय क्षेत्रात शिरकाव करणे, हे राज्यघटनेतील तरतुदींना अभिप्रेत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.


शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांची नियुक्तीही सर्वोच्च न्यायालयाने बेकादेशीर ठरवली आहे. शिवसेनेत दोन गट पडलेले असताना आणि दोन प्रतोद असताना विधानसभा अध्यक्षांनी चौकशी करणे गरजेचे होते. पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या मान्यतेने कोण प्रतोद आहे, हे विधानसभा अध्यक्षांनी तपासायला हवे होते. त्यामुळे भरत गोगावले यांची प्रतोदपदी नियुक्ती बेकादेशीर आहे, असे महत्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

## महत्वाची बातमी

### इम्रान खान यांची अटक बेकायदेशीर

आधुनिक केसरी न्यूज

**लाहोर :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेसंदर्भात गुरुवारी 11 मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायाधीश उमर अता बंदियाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीवर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. तसेच त्यांची अटक बेकायदेशीर असल्याचं देखील न्यायालयाने म्हटले आहे. इम्रान खान यांना इस्लामाबाद उच्च न्यायालयाच्या परिसरातून अटक करण्यात आल्याने न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेला तडा गेला असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सुनावणीदरम्यान न्यायाधीश बंदियाल यांनी म्हटले की, 'कोर्टात भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले'. न्यायालयाने एनएबीला विचारले की न्यायालयातून कशी कोणाला अटक केली जाऊ शकते? सुनावणी दरम्यान खंडपीठाने म्हटले की, 'न्यायालयातील परिसरातातून कोणालाही अटक केली जाऊ शकत नाही'. एनएबीने न्यायालयाचा अपमान केला असल्याचे देखील खंडपीठाने म्हटले आहे.




## लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता

### शरद पवार : सत्तेचा गैरवापर हा सातत्याने केला जातोय, आम्ही त्याविरोधात लढू...

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशात लोकशाही वाचवण्यासाठी एकत्रित येण्याची आवश्यकता आहे. विरोधकांनी एकत्र राहणे गरजेचे आहे. सद्या मिळून काम करणे हे जास्त महत्वाचे असून आम्ही एकत्र काम करू, चेहरा नंतर ठरवला जाईल अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना मांडली. आज बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी आदरणीय शरद पवारसाहेब यांची सिल्व्हर ओक येथे भेट घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. संविधानाची ज्यांच्यावर जबाबदारी असते त्यांनी त्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी घ्यायला हवी असे मतही शरद पवार यांनी व्यक्त केले.

जयंत पाटील यांना ईडीची नोटीस आली तशी आणखी लोकांना आली आहे. आम्ही वाट बघतोय अजून कधी आणि केव्हा येईल. सत्तेचा गैरवापर हा सातत्याने केला जातो आहे हे उत्तम उदाहरण असून आम्ही त्याविरोधात लढू असा इशाराही शरद पवार यांनी यावेळी दिला. राज्यपालांची निवड किती चुकीची केली जाते याचे उत्तम उदाहरण महाराष्ट्राने पाहिले आहे आणि जाहीरपणाने त्यावर ते इथे असताना बोललो आहे. संविधानात राज्यपाल हे एक इन्स्टिटयुशन आहेत. त्याची अप्रतिष्ठा कशी केली जाते याचे उत्तम उदाहरण महाराष्ट्राने पाहिले. सुदैवाने ते आज इथे नाहीत त्यामुळे त्यावर अधिक भाष्य करणे योग्य नाही असे स्पष्ट



सांगतानाच राज्यपालांची निवड करताना जी काळजी घ्यावी लागते ती काळजी न घेता जाणीवपूर्वक तिथल्या स्थानिक अन्य राष्ट्रीय विचारांचे लोकप्रतिनिधींना किंवा संस्थेला त्रास कसा होईल ही भूमिका घेऊन या नियुक्त्या केल्यानंतर हे घडत आहे. त्याचेच उदाहरण आपण महाराष्ट्रात पाहिले असा थेट हल्लाबोलही शरद पवार यांनी पत्रकांरानी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केला. कोर्टाच्या निकालानंतर भाजपविरोधात प्रचार करणे सोपे होणार आहे असे सांगतानाच ज्यांच्या नावाने निवडून येता त्या पक्षाचा आदेश महत्वाचा असतो. काही निर्णय अजून व्हायचे आहेत. त्यामुळे नैतिकता आणि भाजपचा काही संबंध आहे, असे वाटत नाही असा उपरोधिक टोलाही शरद पवार यांनी लगावला.

माझा महाराष्ट्र दौरा सुरुच राहणार असून आता आम्ही तिन्ही पक्ष एकत्र काम करू असा विश्वासही शरद पवार यांनी व्यक्त केला.

## गोड गावरान आंब्यासोबत, आमराईसुद्धा हद्दपार...!

### गोड रसाळ वेगवेगळ्या चवीनुसार ओळख असणारे आंबे झाले दुर्मिळ

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

वाशी : आंबा म्हणजे एक्सपोर्ट केलेला आंबा नव्हे तर गावरानी आंबा होय, मात्र हा आंबा आता हद्दपार झाल्याचे चित्र आहे. गावातील अमराई ही त्या-त्या गावची ओळख असायची, विकासाच्या नावाखाली आणि तोडक्या पैशाच्या निमित्ताने अनेकांनी बांधावरील, शेतातील अमराया नामशेष केल्या, त्यामुळें गावरान आंबे दुर्मिळ झाले आहेत.


पूर्वी उन्हाळ्यात पाहुण्यांना खास आमंत्रण देऊन रसाची मेजवानी असायची. तेही दिवस आता संपले आहेत. गेली वीस ते पंचवीस वर्षापूर्वी तालुक्यातील कुठल्याही खेडेगावात जाताच,आमराईचे दर्शन घडायचे,हिरव्यागार आंब्याच्या झाडांनी नटलेलं गाव,हीच त्या गावची ओळख असायची,कडक उन्हात रस्त्याने जाणारे-येणारे वाटसरु त्या हिरव्या गर्द छायेत विश्रांतीला थांबायचे, रस्त्याच्या कडेला भलीमोठी आंब्याचे झाड असायची. प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर 3 ते4 आंब्याचे झाडे असायची. या निमित्ताने घराघरात आंब्याची रास असायची, संपूर्ण घरात तसेच घरा बाजूच्या आसपासच्या परिसरात आंब्याची सुगी चालू होताच गावाच्या कानाकोपऱ्यात आंब्याचा वास दरवळायचा, घरातील पूर्ण डाळज अंब्याने भरलेले असायचे. गावागावात अनेक नामांकित अमराया अस्तित्वात होत्या, आंब्याच्या वेगवेगळ्या चवीच्या आंब्यामुळे ग्रामीण भागात चंगळ असायची, जावयांना, नातेवाईकांना खास बोलून घेऊन रस पोळी आणि तूप याचा मेनू असायचा. काळाच्या ओघात मानवाने या गावरान आंब्यावर अतिप्रसंग करून स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड चालवली आहे असंच सध्याचं चित्र आहे. आता गावागावातील अमराई पूर्णपणे नष्ट झाल्या आहेत. सवयीप्रमाणे गावरान आंबा म्हणलं की, आंबा खरेदी करताना नवीन पिढी कानोसा घेते.कारण गावरान आंबा काय हे त्यांना माहीतच नाही. आंब्याची अमराई नष्ट करून, त्यावर सिमेंटच् जंगलं उभा करून हीच मंडळी आता आपल्या पिढीला घरातील त्याचं रिकाम्या ढाळजात बसून बाजारामधून किलो दोन किलो आणलेल्या कलमी आंब्याचा आस्वाद घेत असतात. जाणकारानुसार बाजारात कृत्रिम रित्या पिकवलेल्या कलमी आंब्याला गावरान आंब्यापेक्षा जास्त दर आहे.



आजच्या पिढीला गावरान आंब्याची चव जोपण्यासाठी, शेतातील गावरान आंब्याची झाडे जोपासणार आहे.
**(संतोष मोळवणे, आदर्श शिक्षक, वाशी)**

गावरान आंब्याची नावे सुद्धा आताच्या पिढीतील मुला मुलींना माहीत नाही.
**सुलोचना देवडीकर, (उत्कृष्ट आंबा उत्पादक म्हणून शेतीनिष्ठ पुरस्कार, महाराष्ट्र)**

आमच्या गावरान एका आंब्याच वजन एक किलो पर्यंत आहे
**-बाळासाहेब मोळवणे (प्रयोगशील शेतकरी, वाशी)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## वो फिर नही आते...



आपल्या आयुष्यात काही लोकांचे स्थान अतिशय जवळचे असते. त्यांचा आणिa आपला जणू वेगळाच ऋणानुबंध असतो. आपण कधीही त्यांच्याकडे हक्काने जाऊ शकतो. आपल्या ज्या गोष्टी कोणाला सांगायला धजावणार नाही अशा गोष्टी त्यांना सांगत असतो. त्यांच्यावर जीवापाड प्रेम करीत असतो. त्यांच्यावर हक्काने रागावत असतो, रुसत असतो.
आपल्याकडे एखादे कार्य असले आणि ते नाही आले तर खूप रुखरुख लागून राहते. सगळे आले आणि कार्यही सुंदर रीतीने पार पडले तरी. आणि त्यांच्याकडे एखादा कार्यक्रम असला आणि आपण नाही जाऊ शकलो तर त्यांनाही असेच वाटते. पण कधी तरी बोलण्यातून एखादा गैरसमज होतो. आपण संतापून किंवा रागावून त्या व्यक्तीला असे काही बोलतो की ती व्यक्ती आपल्याला कायमची दुरावते. मी मधू गानू यांचं ' सहवास गुणीजनांचा ' हे पुस्तक वाचत असताना पु ल देशपांडे यांनी मधू गानू यांना लिहिलेलं एक पत्र माझ्या वाचनात आलं. सहसा पु ल गंभीर लिहीत नाहीत. पण हे पत्र मात्र तशा प्रकारचं आहे. हे पत्र वाचताना पुलंच्या हळव्या आणि संवेदनाक्षम मनाचा प्रत्यय येतो. वाचता वाचता नकळत आपणही अंतर्मुख होतो. या पत्राचं वैशिष्ट्य असं की हे पत्र पुलंनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात लिहिले आहे. त्यात निरवानिरवीची भाषा आहे. इतरांसाठी पुलंनी आणि सुनीताबाईंनी केलेल्या त्यागाचा उल्लेख आहे. त्यामुळे हे पत्र आपल्या घरातीलच कोणी वडीलधाऱ्या माणसाने आपल्याला लिहिलं आहे असं वाटतं. या पत्राची पार्श्वभूमी थोडक्यात अशी. मधू गानू हे पुलंच्या अत्यंत निकटचे. जणू त्यांच्या घरातीलच एक. पण काही कारणाने मधू गानूंचा गैरसमज झाला आणि त्यांनी संतापून पुलंना नको ते लिहिले आणि जणू त्यांच्यातले संबंध तुटणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. या प्रसंगी पुलंनी त्यांना जे पत्र लिहिलं ते अप्रतिम आहे. निमित्त जरी मधू गानूंचं असलं तरी ते तुम्हा आम्हा सर्वांनाच मार्गदर्शक आहे. या पत्रात पुल म्हणतात -



## आनंदी पहाट

## अर्थक्रांतीसाठी विचारांमध्ये सकारात्मकता आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे ह्या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणं पुरेसे नसून आकर्षक दिसणं आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यकच असते. यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. त्यामुळे सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच आर्थिकदृष्ट्या काही तरतूद करणे अनिवार्य असते. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणे स्वाभाविक असते. एका दिवसाची सुंदरता ही कदाचित खिशाला परवडेल देखील, परंतू ती वर्षानुवर्षे टिकवणे निश्चितच खर्चिक ठरते. एकूणच आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते, ती आपल्या पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची. प्रत्येकाच्या ज्याप्रमाणे गरजा वेगवेगळ्या असतात, त्याचप्रमाणे उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरे कसब आपल्या हाती असणाऱ्या पैशाचा योग्य वापर आणि बचत आपण कशाप्रकारे करतो त्यातच असते. अनेकदा असा गैरसमज असतो कि, जो अर्थार्जन करतो, तोच ते उत्तम प्रकारे करू शकतो. पण खरे तर असे काही नाही. पूर्वीच्या काळांत गृहिणी हाती आलेल्या पैशाची बचत करण्यासाठी स्वयंपाकघरातील धान्याच्या डब्यांचा वापर करत असत, हे आपल्यापैकी अनेकांना ज्ञात आहे. केवळ सकारात्मक दृष्टिकोनातून आपल्या आयुष्यात अर्थक्रांती घडवून आणण्याचे काम आपण स्वतः करू शकतो.



आधुनिक केसरी

**कष्टाचे निधान | यश लाभे ||**

भक्तीत असावा | समर्पित भाव ||
असु नये आव | दांभिकाचा ||१||
आभ्यासे साधावा | ज्ञानीयांचा वसा ||
थोतांडाच्या दिशा | पाहू नये ||२||
लटकी श्रीमंती | तुटकी वहान ||
देत असे तान | अंतरात ||३||
आयत्या धनाला | शिवू नको कधी ||
साध कर्म सिध्दी | दृढतेने ||४||
जप तप ध्यान | यशाचे साधन ||
कष्टाचे निधान | यश लाभे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


देहो विस्मरणीयोऽयम्आ त्मा स्मरणीयः
सदा। दुःखं विस्मृत्य च स्मृत्वा
सुखं भवे भवेत् सुखी ॥3॥
अध्यात्मात नेहमी देह विसरून आत्मा लक्षात ठेवावा. संसारात दुःख विसरून आणि सुख स्मरून सुखी व्हावे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सुत वित कामिनी कामना,
लोक अवर परलोक ।
सब आशा बन्धन भई,
जनम-मरण भव शोक ।।४१ ।।
(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय)
०५/१२/४१
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
पुत्र, धन, सुंदर स्त्री आणि लोक-परलोकाची कामना, या सर्व इच्छा बंधन आहेत. यामुळेच जन्म-मृत्यूचे दुःख प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## ज्ञानगंगा घरोघरी

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

हे वाक्य आजच्या काळातही आपण ऐकतो पण त्याचे वेगळेपण काही वाटत नाही कारण ज्ञानाची कवाडे ऊघडली गेली त्याला आता शतकाच्या वरती काळ लोटला आहे आणि आता तर या ज्ञानगंगेचा प्रवाह द्विशतकाकडे चालला आहे ही खुपच आनंददायी गोष्ट आहे. शिक्षणाचे दार समाजातील शेवटच्या व्यक्ती पर्यन्त पोहचावे यासाठी भगिरथ प्रयत्न करणारे ज्यांना "शिक्षण महर्षी"व "शिक्षण सम्राट "या पदवीने लाखो करोडो च्या पदवीने संबोधीत केले तरी कमी पडेल असे शिक्षण प्रेमी म्हणजे आपले "कर्मवीर भाऊराव पाटील कर्मवीर भाऊराव पाटील हे सातारा जिल्ह्यातील कुंभोज या गावी 1887 साली ऐका सनातनी कुटुंबात जन्माला आले. लहान पण सर्वसामान्य पणे गेले पण जस जसे कळू लागले की शिक्षणातील विषमता नष्ट केली तर समाज अजुन प्रगती चे नवनव दालन ऊघडू शकेल असे त्यांना वाटले व म्हणून अण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.
"स्वावलंबी शिक्षण" हेच या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. "कमवा व शिका" हे विद्यार्थ्यांना कुणी शिकवले असेल तर ते कर्मवीर अण्णांनीच. ते स्वतः सनातनी कुटुंबातील होते आणि आपण पहातो की वडाचे झाड किती ऊपयुक्त आहे. कारण प्रत्यक्ष श्रीकृष्ण जन्माला आल्यानंतर वडाच्या पानावर पहुडला होता। हे झाले अध्यात्मिक पण त्याला विज्ञानाची जोड किंवा वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिले तर वडाचे पान अनंत काळ हिरवे रहाते आणि हा हिरवा रंग"क्लोरोफिल" या तत्वामुळे आलेला असतो .सर्व नाश पावले तरी प्रतिकरूपी हे वडाचे झाड कधीच नाश पावणार नाही.

## संत ‘ तू भगवंताचा आहेस ’ ही जाणीव देतात

आधुनिक केसरी

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यांसमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत ‘तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस’ असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे ‘मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे’ असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुनःपुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे. तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंतःकरणाची पवित्रता पाहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात.



कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे. पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते.

ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण हे आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय. अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्याकरिता करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्याच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.
**आजचे बोधवचन आहे - साधूजवळ कधीही व्यावहारिक गोष्टी मागू नयेत, त्या प्रारब्धावर सोपवाव्यात. श्रीराम समर्थ**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

परोपकारशून्यस्य धिङ्मनुष्यस्य जीवितम् । धन्यास्ते पशवो येषां चर्माप्युपकरोति हि ॥
**स्पष्टीकरण - संसारात माणसांनी एकमेकांना मदत करण्याची गरज असते. पडल्या प्रसंगी माणसाने दुसऱ्याला मदत करायला पुढे झाले पाहिजे. त्यामुळे आपल्यावर प्रसंग आला, तर लोकही आपल्या मदतीला येतील. म्हणजे परोपकार हा एकापरी आपल्यावरच उपकार असतो. पण पुष्कळ माणसे ही गोष्ट लक्षात घेत नाहीत. या श्लोकात अशा स्वार्थी माणसांचा धिक्कार केला आहे.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १२ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# शासकीय रुग्णालयातील केसपेपर वरील जातीचा उल्लेख हद्दपार होणार

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्ह्यात शासकीय रुग्णालयात रुग्णांना केसपेपर काढतांना त्यांच्या जातीचा उल्लेख करावा लागत होता. याबाबत अंनिसने आवाज उठवला होता. सदरचे वृत्त आधुनिक केसरीने प्रकाशित केले होते. याची दखल आरोग्य विभाग आयुक्तांनी घेतली असून याबाबत सुधारणा करण्याचे आदेश जिल्हा शल्य चिकित्सकांना दिले आहेत. नाशिक जिल्ह्यातील एक शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी केसपेपरवरील जातीच्या रकान्यात जातीचा उल्लेख करावा लागत होता. ही बाब अंनिसच्या लक्षात येताच त्यांनी याबाबत आवाज उठवला. याबाबत आधुनिक केसरीने वृत्त प्रकाशित केले होते. यावर महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी जोरदार टीका केली होती. इतर सामाजिक संघटनांनी देखील निषेध व्यक्त केला होता. याबाबत आरोग्य विभाग आयुक्तांनी गंभीर दखल घेऊन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याकडे अहवाल मागितला होता. हा अहवाल अभ्यासल्यानंतर आरोग्य आयुक्त धीरजकुमार यांनी राज्यातील सर्व सरकारी आरोग्य यंत्रणांच्या प्रमुखांना आदेश काढले आहेत. लाभार्थ्यांना जात विचारून त्यांचा अवमान होईल, अशी कोणतीच घटना घडणार नाही याची काळजी घ्यावी, असे लेखी आदेश काढले आहेत. यापुढे केसपेपरवर जात, जमात किंवा पोटजात यांची नोंद न करता लाभार्थ्यांची माहिती अनुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग या सामाजिक प्रवर्ग नुसार नोंदविण्यात यावी. केसपेपर नोंदणी शाखेतील कर्मचाऱ्यांचे व गरज पडल्यास लाभार्थ्यांचे समुपदेशन करावे असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

आधुनिक केसरी IMPACT

जिल्हा शासकीय रुग्णालयात आम्ही केसपेपर बघितला असता त्यावर जातीचा रकाना आढळून आला . आम्ही जिल्हा शल्य चिकित्सकांशी चर्चा केली व आरोग्य मंत्र्यांना निवेदन पाठविले . त्यामुळे केसपेपरवरील जातीचा उल्लेख हटविणार असल्याने आनंद होत आहे . यामुळे राज्याची पुरोगामीत्वाची प्रतिमा अधिक उजळ झाली आहे .

**कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, महाराष्ट्र अंनिस**




# ट्रकसह 83 लाखांचा मुद्देमाल जप्त

## शिरपूर पोलीस स्टेशनचे सुरेश शिरसाठ यांची दमदार कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुका पोलिसांनी इंदोरहून धुळ्यात होणारी गुटखा व तंबाखूची वाहतूक हाडाखेड शिवारातच पकडण्यात आली. मध्यरात्री आणि पहाटेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली दोन ट्रकसह एकूण 83 लाखांची तंबाखू जप्त करण्यात आली. ट्रकमधून महाराष्ट्र राज्यात प्रतिंबधीत असणारी सुगंधीत तंबाखू इंदूरकडून धुळयाकडे नेली जात असल्याची गोपनीय माहिती सपोनि सुरेश शिरसाठ यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकासह मुबई-आग्रा महामार्गावरील दहिवद गावजवळील छत्रपती हॉटेल समोर नाकाबंदी केली. मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास संशयीत ट्रक येताना दिसले. त्या ट्रकला पोलीसांनी हात देवून थांबवले. चालकास वाहनामधील मालाबाबत विचारले असता तो समाधान कारक उत्तर देत नसल्याने वाहन पोलीस ठाणे आवारात आणण्यात आले. तसेच त्यांनतर पुन्हा गुप्त माहितीवरून दुसऱ्या एका ट्रकला ( क्र.के ए01 ए जे 2776 ) हाडाखेड सिमा तपासणी नाका येथे नाकाबंदी करुन पहाटे चार वाजता पकडण्यात आले. या ट्रकवरील चालक देखील समाधान कारक उत्तर देत नसल्याने वाहन पोलीस ठाणे आवारात आणण्यात आले. दोन्ही वाहनाची तपासणी केली असता त्यात तंबाखूचा माल आढळून आला. के ए01- ए जे 0015 ट्रकवरील चालक किशोर राव एन नागेद्रराव ( वय 31 रा. रेल्वे कम्पाऊन्ड मपाडी रोड बँगलोर नॉर्थ, कर्नाटक ) यास ताब्यात घेत

या ट्रकमधून 33 लाख 60 हजार रुपये किंमतीची रत्ना 3000 कंपनीची तंबाखुचे एकूण 280 बॉक्स व 15 लाखाचा ट्रक तसेच दुसऱ्या कारवाईत ट्रक वरील ( क्र. के ए01 ए जे 2776 ) चालक मंजू रोक्कडदम चन्नाप्पा ( वय 33 रा. चन्नाप्पा एन ए प्लॉट मदान भावी धारवाड, कर्नाटक ) याला ताब्यात घेत या ट्रकमधून 12 लाखाची रत्ना 3000 कंपनीची तंबाखूचे एकूण 100 बॉक्स व 7 लाख 64 हजार 400 रुपये किंमतीची प्रभात 310 कंपनीची तंबाखूचे 65 बॉक्स व 15 लाखाचा ट्रक अशा दोन्ही वाहनानसह एकूण 83 लाख 24 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. धुळे येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालय यांना लेखी पत्र देवून पुढील कायदेशीर कार्यवाई सुरु आहे.

ही कारवाई पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे व प्रभारी उपविभागिय पोलीस अधिकारी अंसाराम आगरकर यांच्या मार्गर्शनाखाली शिरपूर तालूका पोलीस ठाण्याचे सपोनि सुरेश शिरसाठ, संदीप पाटील,कृष्णा पाटील, पोहेकॉ संजय सुर्यवंशी,संदीप ठाकरे, रोहीदास संतोष पावरा, मनोज पाटील, संतोष पाटील, इसरार जकाउल्ला फारुकी, कृष्णा पावरा, मुकेश पावरा, योगेश मोरे यांच्या पथकाने केली आहे.

# नाना पटोलेंची भाजपा, कोश्यारींवर टीका

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाविकास आघाडी सरकार पाडण्यात राज्यपालांची प्रत्येक कृती चुकीची होती, यावर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर ताशेरे ओढले आहेत. राजभवनचा गैरवापर करुन भाजपाने महाराष्ट्रातील मविआचे सरकार पाडले, हे आम्ही सातत्याने सांगत होतो. तेच सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. शिंदे-भाजपा सरकार हे असे वैधानिक व बेकायदेशीर आहे, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले, असे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी नाना पटोलेंनी केली. "मविआ सरकार पाडण्यासाठी भारतीय जनता पक्षाने पहिल्या दिवसापासूनच अनेक प्रयत्न करत राजभवनाचा गैरवापरही केला. मविआ सरकार पाडण्यासाठी राज्यपालांसह सर्व यंत्रणांनी घेतलेले निर्णय चुकीचे आहेत. भरत गोगावले यांची प्रतोदपदी केलेली निवडही चुकीची असल्याचे न्यायालयाने सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे पाहता भाजपाने लोकशाहीची धिंडवडे उडवल्याचे स्पष्ट करत आहे, अशी टीका नाना पटोलेंनी केली. भाजपा सत्तेसाठी कोणत्याही थराला जातो हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सर्व सरकारी यंत्रणा मोदी सरकारच्या दावणीला बांधलेल्या असून लोकशाही व संविधानासाठी हे घातक आहे हे काँग्रेस सातत्याने सांगत आहे, असेही नाना पटोले म्हणाले. एकनाथ शिंदेंच्या सरकारला काहीसा दिलासा मिळालेला असला, तरी सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे चिंताजनक आहेत. एकनाथ शिंदे यांनी भाजपाबरोबर स्थापन केलेले सरकार बेकायदेशीर ठरलेले आहे.



# व्हॉइस ऑफ मीडियाचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकारांसाठी काम करणाऱ्या संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ११ मे रोजी संपूर्ण राज्यभर जिल्हा व तालुका स्तरावर धरणे आंदोलन करण्यात आले. त्याच्याच एक भाग म्हणून संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया व जिल्हाध्यक्ष गजानन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिंतूर शहरात देखील तहसील कार्यालयासमोर आज ( गुरुवारी )एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाला झाड फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष गजानन देशमुख, शिवसेनेचे तालुकाप्रमुख ॲड. सुनील बुधवंत,व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष रमेश दरगड,आडत व्यापारी असोसिएशनचे सचिन देवकर, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, पुरुषोत्तम पोरवाल, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे, ॲड मनोज सारडा, गोपाळ रोकडे, गणेश कुऱ्हे, शरद चव्हाण, लक्ष्मण बुधवंत, बाळासाहेब काजळे, माजी नगरसेवक संतोष आंधळे, माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, ल्हास जिंतूरकर, माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, राजेभाऊ नगरकर आदींनी भेटी देऊन आंदोलनास जाहीर पाठींबा दिला. यावेळी विजय चोरडिया, भागवत चव्हाण, मंचक देशमुख, महेश देशमुख, संदीप माहूरकर, सचिन रायपत्रीवार, अब्दुल माबुद खान, रामप्रसाद कंठाळे, शंकर जाधव, दिलीप माघाडे, राम रेघाटे, रामप्रसाद दराडे, रफिक तांबोळी, शेख अलीम, शेख शकील अहमद, पठाण शहेजाद खान, राजू गारकर, संतोष तायडे, खयूम खान, राजाभाऊ काळे, मनोज टाक, दिलीप देवकर, राजाभाऊ काकडे, शेख अहमद, बि.डी रामपूरकर, एम.एजाज, राहुल वावळे, काशिनाथ घुगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# निकाल 'आप'बाजूने

आधुनिक केसरी

दिल्लीमध्ये अधिकाऱ्यांची नेमणूक आणि बदली करण्याचे अधिकार निवडून आलेल्या सरकारच्या अखत्यारीत असावे, अशी याचिका दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवरचा निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने सुनावला. न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी १८ जानेवारी रोजी केली होती. त्याचा निकाल आज सुनावण्यात आला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार दिल्ली सरकारचा आहे, उपराज्यपालांचा नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. हा निकाल देत असताना पोलीस, जमीन आणि पब्लिक ऑर्डर हे तीन विभाग केंद्र सरकारच्या अखत्यारीत ठेवण्यात आले आहेत. हे तीन विषय वगळता दिल्लीचे उपराज्यपाल राज्य सरकारच्या इतर निर्णयांना बांधिल असतील, असेही सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी निकाल सुनावताना सांगितले. दिल्ली राज्य सरकार विरुद्ध उपराज्यपाल या प्रकरणावर निकाल देणाऱ्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाचे नेतृत्व सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी केले. या खंडपीठात न्यायाधीश एम आर शाह, न्यायाधीश कृष्णा मुरारी, न्यायाधीश हिमा कोहली आणि न्यायाधीश पीएस नरसिम्हा यांचा सहभाग होता. खंडपीठाने सुरुवातीलाच २०१९ साली न्यायाधी अशोक भूषण यांनी दिलेल्या निकालावर खंडपीठाने असहमती दर्शविली. अशोक भूषण यांनी 'सेवा' हा भाग दिल्ली सरकारच्या अखत्यारीत येत नसल्याचा निकाल दिला होता. दरम्यान आम आदमी पक्षाने या निर्णयाचे स्वागत केले आहे. "निवडून दिलेल्या सरकारला अधिकऱ्यांची बदली आणि नियुक्ती करण्याचे अधिकार आहेत. अधिकारी निवडून दिलेल्या सरकारच्या निर्देशानुसार काम करतील. केंद्र सरकारने पॅराशूट लावून पाठविलेल्या उपराज्यपालांकडे अधिकाऱ्यांचे नियंत्रण करण्याचे कोणतेही अधिकार राहणार नाहीत... सत्यमेव जयते, असे ट्विट करून आप पक्षाने आपला आनंद व्यक्त केला. मुख्यमंत्री की उपराज्यपाल, दिल्लीचा प्रमूख कोण? असा हा वाद होता. केंद्र सरकारने २०२१ साली, गर्व्हरमेंट ऑफ एनसीटी ऑफ दिल्ली या कायद्यात सुधारणा केली होती. यानुसार दिल्लीच्या उपराज्यपालांना सर्व अधिकारी देण्यात आले होते. आम आदमी पक्षाने या कायद्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. राज्य सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करण्यासाठी केंद्र सरकारने उपराज्यपाल यांचा वापर सुरू केला असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला होता.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# 'द केरळ स्टोरी'वर गदारोळ का होतोय

आधुनिक केसरी

**'द केरळ' या चित्रपटाबाबत गेल्या काही दिवसांपासून गदारोळ सुरू आहे. या चित्रपटावर बंदी घालण्याचीही मागणी होत आहे. चित्रपटात हिंदू आणि ख्रिश्चन मुलींबाबत वेगवेगळे दावे करण्यात आले आहेत. एकीकडे मुस्लिम समाज या चित्रपटाला विरोध करत असताना दुसरीकडे राजकारणातही खळबळ उडाली आहे. हा चित्रपट ५ मे रोजी प्रदर्शित झाला आहे. मात्र त्याआधी चित्रपटावर बहिष्कार टाकून तो प्रदर्शित करण्यापासून रोखण्याची मागणी झाली चित्रपटाच्या प्रदर्शनाला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्या. परंतु सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.**

केरळमधील ३२ हजार महिलांचे बळजबरीने धर्मांतर करून त्यांना ईसिस मध्ये सामील केल्याची कथा चित्रपटात दाखवण्यात आली आहे. चित्रपटात दाखवण्यात आलेली ही कथा खोटी असल्याचे सांगून समाजातील एक घटक याला विरोध करत आहे.

'द केरळ स्टोरी' हा चित्रपट भारताच्या दक्षिणेकडील राज्य केरळमधील ३२,००० महिलांची कथा आहे. या महिलांना बळजबरीने इस्लाम धर्म स्वीकारून सीरियात पाठवण्यात आल्याचा दावा या चित्रपटात करण्यात आला आहे. ट्रेलर रिलीज झाल्यानंतर हा चित्रपट वादात सापडला आणि लोकांनी त्याचे प्रदर्शन रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास सुरुवात केली. याचिकेत 'सर्वात वाईट प्रकारचे द्वेषयुक्त भाषण' आणि 'दृकश्राव्य प्रचार'

२ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने 'द केरळ स्टोरी' विरोधात दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करण्यास स्पष्टपणे नकार दिला. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने मान्यता दिली आहे, त्यामुळे सर्वोच्च न्यायालय या प्रकरणात हस्तक्षेप करणार नाही.

या चित्रपटाचा दावा आहे की सुमारे ३२,००० हिंदू आणि ख्रिश्चन मुलींचे ब्रेनवॉश केले गेले, मुस्लिम मुलांनी लग्नासाठी फसवले आणि दहशतवादी संघटना ईसिस

मध्ये सामील होण्यासाठी इराक, सीरिया, अफगाणिस्तानात पाठवले. हा आकडा योग्य नसल्याचा निषेध व्यक्त केला जात आहे, केरळच्या मुख्यमंत्र्यांनाही ३२ हजारांचा आकडा बरोबर नसल्याचे विधान करावे लागले, मात्र केरळची ही कथा कुठून असा प्रश्न चित्रपटापासून दूर आहे. केरळचे नाव वारंवार का येत राहिले.

**केरळचे नाव का जोडले जाते?**

१९५०आणि ६० च्या दशकात केरळवासीयांचा मोठा वर्ग मध्यपूर्वेत स्थलांतरित झाला. काही लोक कोणत्याही कागदपत्रांशिवाय छोट्या बोटीतून तिथल्या देशांत गेले. इराक, अफगाणिस्तान आणि सीरियासारखे देशही हळूहळू दहशतवादाचे गड बनले. या प्रवासाला अनेक दिवस आणि महिने लागले, पण त्यानंतर काय एक खजिना होता. तेल कंपन्यांकडून पैसे मिळाले.. केरळमध्ये श्रीमंती येऊ लागली.. असे मानले जाते की, वर्षानुवर्षे सुमारे ३० लाख लोक मध्यपूर्वेमध्ये काम करत आहेत, यापैकी १० टक्के किंवा त्याहून अधिक लोकसंख्या केरळमध्ये आहे. आखाती देश आणि तेथून मिळणारा पैसा यामुळे केरळमधील लोकांची समृद्धी वाढली

**केरळची लोकसंख्या**

२०११ च्या जनगणनेनुसार, केरळच्या लोकसंख्येपैकी ५४ टक्के हिंदू, २६ टक्के मुस्लिम आणि १८ टक्के ख्रिश्चन आहेत. केरळमध्ये उच्च साक्षरता आहे आणि भाषा आणि खाद्यपदार्थांमुळे दिल्ली दूर दिसते. केरळमधील स्त्रिया दिल्ली आणि मुंबईसारख्या ठिकाणच्या रुग्णालयांमध्ये परिचारिकांच्या बहुतेक भूमिका करतात, परंतु त्यांची संख्या कमी आहे. राज्यात प्रत्येकजण साक्षर आहे त्यामुळे रोजगार मिळवणे हे अवघड काम आहे आणि येथूनच दहशतवाद आणि इसीस सारख्या दहशतवादी संघटनांचा प्रवेश होतो. गेल्या काही दशकांपासून केरळ आणि दहशतवाद हे नाव एकत्र घेतले जाऊ लागले आहे.

**केरळमधील मोठ्या घटना**

हे समजून घेण्यासाठी गेल्या १० वर्षांतील तीन महत्त्वाच्या घटनांवर नजर टाकणे आवश्यक आहे.

२०१६ मध्ये, एनआयएने २१ लोकांची यादी जारी केली ज्यांनी इसिस मध्ये सामील होण्यासाठी केरळ सोडल्याचा संशय होता. या २१ लोकांपैकी ६ महिलाही होत्या. १४ लोक २६ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते.






दुसरी घटना काही काळापूर्वी घडली, जेव्हा तालिबानने अफगाणिस्तानमध्ये पुन्हा सत्ता स्थापन केली तेव्हा तेथील तुरुंगात चार भारतीय महिला कैद झाल्या होत्या. या चार महिलांना आयएसमध्ये सामील होण्यासाठी अफगाणिस्तानात पाठवण्यात आले असून या चारही महिला आपल्या पतीसह खोरासान प्रांतात ( आयएसकेपी ) गेल्याचे तपासात समोर आले आहे. मात्र, त्यांच्या मुलींना मुक्त करून भारतात आणावे, अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांनी भारत सरकारकडे केली होती. भारत सरकारने याची परवानगी दिली नाही, त्यानंतर त्याला अफगाणिस्तानच्या तुरुंगातूनच सोडण्यात आले. तिसरी घटना जानेवारी २०२३ ची आहे जेव्हा मोहम्मद पोला कन्नीला एन आय ए न्यायालयाने सात वर्षांची शिक्षा सुनावली होती. तो आयएसचा सदस्य होता आणि केरळ आणि तामिळनाडूच्या न्यायाधीश, पोलीस अधिकारी आणि बड्या राजकारण्यांना मारण्याची त्याची योजना होती. तो सोशल मीडियाच्या माध्यमातून आयएसशी जोडला गेला होता आणि तिथे सामील होण्यासाठी तो जॉर्जियालाही गेला होता, त्याला जॉर्जिया तुर्की सीमेवरून सीरियाला जायचे होते.

भारतात धर्मांतर, विवाह किंवा निकाह किंवा बळजबरीने होणारे धर्मांतर अशा चर्चा होत आहेत आणि काही वर्षांपूर्वी एक लोकप्रिय प्रकरणही समोर आले होते. हादिया प्रकरण असे त्या प्रकरणाचे नाव आहे. यामध्ये एका हिंदू मुलीचे मुस्लिम मुलाशी लग्न झाले. मुलीचे बळजबरीने धर्मांतर करण्यात आल्याचा आरोप मुलीच्या वडिलांनी केरळ उच्च न्यायालयात केला आहे. केरळ उच्च न्यायालयाने हे लग्न बेकायदेशीर ठरवले. सुप्रीम कोर्टाने नंतर उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवला आणि भारतातील दोन प्रौढ व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लग्न करू शकतात, असे सांगून विवाह पूर्ववत केला.

सुप्रीम कोर्टाने म्हटले की, जर चित्रपटाला आव्हान द्यायचे असेल, तर तुम्हाला ते सर्व पुराव्यासह योग्यरित्या आव्हान द्यावे लागेल. केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनीही चित्रपटाबाबत आक्षेप व्यक्त केला होता. त्यांनी चित्रपटाच्या कथेला संघ परिवाराच्या लबाडीच्या कारखान्याची निर्मिती म्हटले आहे. त्याचबरोबर काँग्रेसनेही याला 'खोट्यांचा पोळा' म्हटले आहे. तृणमूल काँग्रेस अर्थात प बंगाल मध्ये ममता बॅनर्जी यांनी या चित्रपटाचे बंदी घातली आहे.

काँग्रेस नेते शशी थरूर यांनी चित्रपटाच्या निर्मात्यांवर राज्याच्या वास्तवाची "घोर अतिशयोक्ती" केल्याचा आरोप केला. मुस्लिम लीगसोबतच, शशी थरूर यांनी केरळमध्ये ३२,००० महिलांना जबरदस्तीने इस्लाममध्ये धर्मांतरित केल्याचा चित्रपटाच्या कथेचा पुरावा देणाऱ्या व्यक्तीला १ कोटी रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणाही केली.

चित्रपटाचे दिग्दर्शक सुदीप्तो सेन आणि निर्माता विपुल अमृतलाल शाह यांनी चित्रपटाची कथा सत्य घटनांवर आधारित असल्याचा दावा केला आहे. विरोध करूनही ते आपल्या मुद्द्यावर ठाम आहेत.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# अस्थिर पाकिस्तान

आधुनिक केसरी

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तेहरिक ए इंसाफ पाकिस्तान पक्षाचे प्रमुख इम्रान खान यांना अखेर अटक झाली. इम्रान खान सत्तेवरुन पायउतार झाले तेंव्हापासूनच इम्रान खान यांना अटक होईल अशी अटकळ बांधली जात होती ती अखेर खरी ठरली. याआधीही इम्रान खान यांना अटक करण्याचे प्रयत्न झाले परंतु त्यांचे समर्थक त्यांची ढाल बनून उभे राहिल्याने पोलिसांना त्यांना अटक करणे शक्य झाले नाही. मात्र यावेळी ते शक्य झाले कारण ते त्यांच्यावरील खटल्यासंदर्भात न्यायालयात आले होते. पोलिसांनी त्यांना तेथूनच उचलले आणि नजरकैदेत ठेवले. त्यांच्या निधनाने पाकिस्तानात हिंसेचा आगडोंब उसळला असून अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत.**

इम्रान खान यांचे समर्थक आणि कार्यकर्ते रस्त्यांवर उतरून जाळपोळ व लुटालूट करत आहेत. इम्रान खान आणि त्यांच्या पत्नी बुशरा खान यांचा कादिर ट्रस्ट नावाचा ट्रस्ट आहे. हा ट्रस्ट एक विद्यापीठ चालवीत आहे. खरं म्हणजे विद्यापीठ हे नाममात्रच आहे. सहा वर्षात केवळ ३२ मुलांनाच या ट्रस्टमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. इम्रान खान पंतप्रधान असताना या ट्रस्टला विद्यापीठाच्या नावाने शेकडो एकर जमीन देण्यात आली. पदाचा गैरवापर करून त्यांनी ही जमीन बळकावली असा त्यांच्यावर आरोप होता. याशिवाय इम्रान खान तोशाखाना प्रकरणातही आरोपी आहेत. इम्रान पंतप्रधान असताना त्यांना विदेशातून भेट स्वरूपात ज्या वस्तू मिळाल्या त्यातील काही वस्तू त्यांनी विकल्या आणि त्यातून करोडो रुपये कमावले असा त्यांच्यावर आरोप आहे. पाकिस्तानी कायद्यानुसार पंतप्रधानांना परदेशातून मिळालेल्या भेटी कोषागारात ठेवाव्या लागतात. त्या विकता येत नाही आणि जर विकायच्या असतील तर त्याचा लिलाव करावा लागतो आणि त्यातून मिळणारी रक्कम सरकारी खजिन्यात जमा करावी लागते. इम्रान यांनी ती रक्कम सरकारी खजिन्यात जमा न करता स्वतःच्या खिशात जमा केली. हे दोन्ही आरोप त्यांच्यावर सिद्ध झाल्याने त्यांना अटक करण्यात आली असे सरकार तर्फे सांगण्यात येत आहे. भ्रष्टाचार प्रकरणात इम्रान यांना अटक



झाली असे सरकार सांगत असले तरी त्यावर इम्रान समर्थक विश्वास ठेवायला तयार नाहीत त्यांच्यामते इम्रान यांना अटक करण्यामागे पाकिस्तानी लष्कर आणि विद्यमान सरकार यांची मिलीभगत हेच कारण आहे. इम्रान पंतप्रधान असतानाच त्यांचे आणि लष्कराचे संबंध बिघडले होते. इम्रान लष्कराला विश्वासात न घेता काम करत असल्याने त्यांच्यात अनेकदा वाद झाले. हा वाद इतका विलोपाला गेला की लष्कराने इम्रान यांना खुर्ची सोडायला लावली. लष्करानेच कट करून आपल्याला पदच्युत केले असे त्यांनी अनेकदा म्हटले आहे इतकेच नाही तर लष्कर आपल्याला जीवे मारण्याचा प्रयत्न करत आहे असाही आरोप त्यांनी केला होता. तसा त्यांच्या हत्येचा प्रयत्नही झाला मात्र सुदैवाने ते त्यातून बचावले. लष्कराच्या सांगण्यावरूनच इम्रान यांना अटक झाली असा इम्रान समर्थकांचा दावा आहे त्याचाच निषेध करण्यासाठी ते रस्त्यावर उतरत आहे. अर्थात पाकिस्तानला हे नवे नाही. खुर्ची सोडावी लागलेल्या पंतप्रधानांना भ्रष्टाचार प्रकरणी अटक करून त्यांना देशाबाहेर हाकलून लावणे ही पाकिस्तानची परंपराच आहे. याआधी सत्तेवर असलेले जनरल परवेज मुशर्रफ, बेनझीर भुट्टो, नवाज शरीफ या पंतप्रधानांवर देखील भ्रष्टाचाराचे आरोप करून देशाबाहेर हाकलून लावण्यात आले होते. एका माजी प्रमुखाला तर थेट फासावर लटकविण्यात आले होते. त्यामुळे इम्रान खान यांनाही काही दिवस नजरकैदेत ठेवून नंतर त्यांची रवानगी लंडनला करण्यात येईल. मात्र तोवर पाकिस्तान हिंसेच्या आगीत जळत राहील हे नक्की.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वेरूळ बायपास बनला मृत्यूचा सापळा

## वेरूळ-माटेगाव चौफुलीवर महिला ट्रक खाली चिरडून जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** वेरूळ येथील रहिवासी माया बाबासाहेब ढीवरे 36वर्षे ही वेरूळ कडे येत असताना सोलापूर धुळे महामार्गावरील माटेगाव चौफुली वर रस्ता ओलांडताना समोरून जोरात येणारा ट्रक ने धडक दिसल्यामुळे माया ढीवरे या ट्रकच्या मागच्या चाका खाली चिरडून जागीच ठार झाली.

अपघात होताच वेरूळचे ग्रामपंचायत सदस्य शेख मासियोद्दिन आणि त्यांचे सहकारी यांनी अपघातग्रस्त मदत करून अपघातामध्ये झालेले महिलांचे मेंदूचे तोंडाचे हाताचे तुकडे गोळा करून एका ठिकाणी एकत्र करून त्या महिलेला स्वतः हाताने ॲम्बुलन्स मध्ये टाकून पुढील कार्यवाही शव विच्छेदनासाठी वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पाठवण्यात आले. झालेल्या अपघाताची माहिती मिळताच वेरूळचे पोलीस पाटील रमेश ढीवरे यांनी तात्काळ खुलताबाद पोलीस स्टेशनला कळवले असता पोलीस जमादार रितेश आव्हाड आणि विनोद बिघोत यांनी घटनास्थळी धाव घेऊन रस्त्यावरील ट्राफिक सुरळीत करून झालेल्या अपघाताचा पंचनामा केला. गेल्या दोन वर्षापासून नुकताच नवीन झालेला सोलापूर धुळे महामार वेरूळ ला जोडणारा वेरूळ- माटेगाव चौफुली रोड या ठिकाणी गेल्या दोन वर्षापासून अनेकांना येथे जीव गमवा लागला आहे. मागे चौफुली आणि पुढे उड्डाणपूल. सोलापूर धुळे महामार्गाचा झालेला उड्डाणपूल चुकीचा तयार करण्यात आला आहे. याची बांधकाम विभागाने कसा तयार केला याची चौकशी व्हावी असे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना मोठा प्रश्न पडला आहे. या उड्डाणपुलाची पाहणी प्रत्यक्ष आयुक्तासह कलेक्टरने करावी अशी मागणी सतीश देवेंद्र लोखंडे, वेरूळकर यांनी केली आहे. खरं तर चौफुलीच्या पुढे बांधण्यात आलेला उड्डाणपूल हा काहीच कामाचा नसून तो उड्डाणपूल हा या चौफुलीवरच आवश्यक होता. ह्या चौफुलीवर उड्डाणपूलाची खूप गरज असून येथे उड्डाणपूल नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून या ठिकाणी अनेकांना जीव गमवा लागला आहे.

अंडर बायपास करणे गरजेचे धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्ग हा मृत्यूचा सापळा बनला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मनमानी पद्धतीने रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे नागरिकांचा नाहक जीव जात असून वेरूळ माटेगाव चौफुली वर अंडरपास करणे गरजेचे आहे. जर अंडरपास केला असता तर आज या गरीब महिलेचा जीव गेला नसता.
**सतीश देवेंद्र लोखंडे, वेरूळकर, आम आदमी पार्टी जिल्हा उपाध्यक्ष युवक आघाडी**





## पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव (जामोद) :** व्हाइस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के पाटील, जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे यांच्या सूचनेनुसार पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी जळगाव ( जामोद ) उपविभागीय कार्यालय समोर दि.११ मे रोजी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. पत्रकारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करून त्याला भरून निधी देणे,पत्रकारितेत पाच वर्षे पूर्ण केलेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी, वृत्तपत्रांना सध्या जाहिरातीवर लागू असलेला जीएसटी रद्द करावा, पत्रकारांच्या घरासाठी विशेष बाब म्हणून शासकीय भूखंड देण्याचा निर्णय घ्यावा, कोरोना काळात जीव गमावलेल्या पत्रकारांना फ्रंट लाईन वर्कर चा दर्जा देऊन त्यानुसार मयत पत्रकारांच्या कुटुंबांचे पुनर्वसन करावे, शासनाचे सध्याचे जाहिरात धोरण ब वर्ग दैनिक यांना मारक आहे, लघु दैनिक, मध्यमवर्ग दैनिकात जाहिराती देण्यात याव्यात तसेच साप्ताहिकांनाही त्या प्रमाणात जाहिराती द्याव्या, अशा विविध मागण्यांसाठी व्हॉइस ऑफ मीडिया वतीने हे आंदोलन जाहीर करण्यात आले होते. ह्या आंदोलनात अनिल पाटील, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष गुलाबराव इंगळें, जयदेव वानखडे, डॉ.राजेंद्र ताणकर, सागर झनके, गणेश भड, राजेश बाठे, अनिल भगत,विनोद वानखडे, विनोद चिपडे, महंमद फारूक,योगेश म्हसाळ, आकाश उमाळे, गजानन सोनटक्के, राजकुमार भड, सुरेश कलंत्री, राहुल निर्मळ, अमर तायडे, गजानन खिरोडकर, जफर खान, शिवदास सोनवणे, पितांबर वडोदकर प्रदीप बोबडे नागपुरे यांच्यासह तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांची धरणे आंदोलनामध्ये उपस्थिती होती. व्हॉईस ऑफ मीडियाच्या ह्या आंदोलनाला राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस प्रसेनजीत पाटील निलेश शर्मा, डॉ. स्वाती वाकेकर, डॉ .संदीप वाकेकर, शाहू परिवाराचे मनोज वाघ काँग्रेस तालुकाध्यक्ष अविनाश उमरकर भाजपा तालुका अध्यक्ष प्रकाश वाघ निलेश शर्मा, ॲड.संदीप मानकर, वंचितचे सुनील बोदडे, अमोल दाभाडे, दादाराव धंदर, विनोद धंदर ह्यांनी धरणे आंदोलनाला भेट देऊन समर्थन दर्शविले. धरणे आंदोलनानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना आपल्या विविध मागण्यांचे निवेदन पत्रकार बांधवांच्या वतीने सादर करण्यात आले.

## धर्मवीर छत्रपती संभाजीराजे चौकातील अस्वच्छता व अतिक्रमणे हटवा

### शिवशंभू प्रेमींकडून आष्टी ग्रा.पं.ला मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौक' येथे कंपाउंड नसल्यामुळे दुचाकी वाहन उभे करण्यात येत आहे व तसेच सुशोभीकरण नसल्याने घाणीचे साम्राज्य होत आहे तर अतिक्रमणामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौक कोठे आहे हे लोकांना माहीत नाही त्यामुळे तेथे ध्वजासाठी वट्टा,व संपूर्ण जाग्याला कंपाउंड,करून झाडे,लावण्यात यावे बसण्यासाठी सिमेंट किंवा लोखंडी बेंच,करण्यात यावे या करिता आष्टी ग्रामपंचायत अंतर्गत निधी देण्यात यावा अशी मागणी आष्टी व परिसरातील असंख्य सर्व जातीय धर्मातील शिवशंभू प्रेमींकडून आष्टी ग्रामपंचायत कडे निवेदना मार्फत देण्यात आली आहे निवेदनात म्हटले आहे की परतूर तालुक्यातील आष्टी हे गाव 40 खेडयांची मोठी बाजारपेठ असुन या संपूर्ण परिसरातील आणि आष्टी शहरातील शिवशंभू प्रेमी यांच्या चर्चेतून अनेक वर्षापासुनची एक मागणी नेहमीच चर्चेत होती मात्र मुहूर्त स्वरूप देण्याकरिता असंख्य शिवशंभूप्रेमींच्या बैठकीत असा ठराव घेण्यात आला व सर्वानुमते सुचवण्यात आले आहे की आष्टी शहरात बँक ऑफ महाराष्ट्र च्या समोरिल चौकास धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौक' असे नाव देण्यात आले आहे त्याचा ठराव क्रमांक 07/4 हा असून ठराव आष्टी ग्रा. पं. बैठकीत दि.08/11/2019 रोजी घेण्यात आला होता तरी मा. ग्रामविकास अधिकारी,सरपंच,उपसरपंच, तथा सर्व सन्माननीय सदस्य सर्वानी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौकात होत असलेले घाणीचे साम्राज्य व व्यवस्तीत कंपाउंड नसल्याने तेथे दुचाकी वाहन उभे करण्यात येत आहे त्या करिता कंपाउंड करून सुशोभीकरण करणे आवश्यक आपल्या आष्टी शहराचं आकर्षण व्हावं त्यासाठी अवती भवती झाडे लावावीत झालेले अतिक्रमनामुळे कचरा होऊन घाणीचे साम्राज्य होत आहे नालीचे पाणी जमा होत आहे त्या करीत व्यवस्थित नाली बनवून झालेलं अतिक्रमण हटवण्यात यावं व ध्वजासाठी वट्टा, संपूर्ण जाग्याला कंपाउंड, झाडे लावावी, बसण्यासाठी सिमेंट किंवा लोखंडी बेंच,मारकुडी लाईट इत्यादि आष्टी ग्रामपंचायत अंतर्गत देण्यात यावे अशी मागणी आष्टी व परिसरातील असंख्य शिवशंभू प्रेमींच्या निवेदनावर साह्य करण्यात आल्या आहेत.

## ईदारा फलाहे इन्सानियत कमिटी तर्फे गरजूंना मदत

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी येथे दरवर्षी प्रमाणे यंदा ही ईदारा फलाहे इन्सानियात कमिटी तर्फे गरजूंना 71 किराणा साहित्य किटचे वाटप करून एक हात मदतीचा या भावनेतून वाटप करण्यात आले असून, सदर कमिटी तर्फे मागील सात वर्षा पासून हे उपक्रम रमजान महिन्यात राबविले जात असून यंदा ही कमिटी तर्फे मोठ्या प्रमाणात किराणा साहित्याची मदत घरोघर जाऊन गरजवणता पर्यन्त पोहचविण्यात आल्याने गरजवंतामधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मुस्लिम् धर्मातील पवित्र रमजान माहीना हा अल्लाहा ची इबादत्, एक महिना उपवास ,जकात त्या नंतर मोठ्या उत्साने ईद साजरी केली जाते मात्र, यात गरिबांना ईद साजरी करण्यात मदत करण्यात यावी त्यांच्या ही घरी रौष्णयी यावी तिच खरी ईद आहे व त्यातच खरा आनंद आहे. अस या वेळी फलहे इन्सानियात कमिटीच्या सदस्यांनी आपल्या भवानांना उजाळा दिला.

महाराष्ट्र Business Katta












# बेपत्ता महिला : सामाजिक समस्या



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या देशाचा जर विचार केला तर, देशामध्ये दररोज अनेक महिला बेपत्ता होण्याच्या तक्रारी दाखल होत आहेत. हा खूप चिंतेचा विषय आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांच्या हितासाठी काम करणारे सरकार सर्वसामान्य लोकांना हक्क न्याय अधिकार मिळवून देऊन त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची असताना, जर महिला बेपत्ता होत असतील, आणि सर्व यंत्रणा असून सुद्धा त्या महिलांचा शोध जर लागला जात नसेल तर, हा विषय अजून गंभीर होऊन बसतो. भारतात खरे बोलणे म्हणजे विद्रोह होतो, आणि सरकार विरुद्ध बोलणे देशद्रोह होतो. सरकारने खोटे नाटे काल्पनिक, काहीही सांगितले तरी त्याला सत्य मानून तसे वागणे त्यालाच देशभक्त व धर्माला मानणारा व्यक्ती म्हणून मान्यता मिळते.**

बाकीच्यांना देशद्रोह आणि धर्मविरोधी म्हणून शिक्का मोर्तब होते. हे वास्तव नाकारता येणार नाही. नेहमीच धर्माचा विषयावर काही ना कुठे ना कुठे द्वेष व मत्सर पसरवून दंगल केली जाते, तर सरकारने ज्या गोष्टीवर काम करायला पाहिजेत त्या गोष्टीवर काम न करता सरकारच धार्मिक गोष्टीवर काम करून, धर्माला प्राधान्य देत आहे. आणि म्हणून प्रत्येक ठिकाणी धर्माचा उल्लेख केला जातो कोणत्याही कामांमध्ये धर्म आणि किंवा कोणत्येही काम दुसऱ्यावर ढकलून देणे, यातच सरकार धन्यता मानत आहे. सरकारचा जर एक विचार केला तर धर्माच्या नावाखाली सरकारने गाईला अत्यंत महत्त्व दिलेले आहे. ही धर्माची माता असून तीच रक्षण संरक्षण करणे आवश्यक आहे. असा संदेशही सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलेला आहे. गोहत्या बंदी कायदा करून गोहत्या थांबवण्याचा प्रयत्न सरकारने केलेला आहे. देशातून सर्वात जास्त गो मांस विदेशात निर्यात करणाऱ्या कंपन्या सर्वात मोठ्या कंपन्या यांच्यासाठी मात्र हा कायदा लागून नसल्याचे स्पष्ट दिसून येते. तो भाग वेगळा असला तरी एखाद्याच्या पिशवीमध्ये गोमांस आहे अशा संशयावरून तरुणांची हत्या केली जाते, परंतु त्याच देशामध्ये स्त्रीची सुद्धा देवी म्हणून पूजा केली जाते. परंतु स्त्रीची देवी म्हणून पूजा केली जाते तिच्या संरक्षणाच्या, तिच्या न्याय हक्काचे व त्याच्या सन्मानाचे पाऊल सरकार उचलताना दिसत नाही. गाईला वाचवणारे बाईला का बर वाचवत नसेल. हा सर्वात मोठा प्रश्न समोर येतो. हल्ली समोर आलेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षांमध्ये एकट्या गुजरात मधून 41621 महिला बेपत्ता झाल्या आहेत. पाच वर्षांमध्ये एवढ्या महिला बेपत्ता होणे हा किती गंभीर विषय आहे, आणि या गंभीर विषयावर स्त्रीची पूजा करणारी लोक स्त्रीचा सन्मान करणारे लोक, सरकार मीडिया कोणीच का बोलत नसेल, एवढे मोठ्या प्रमाणात स्त्रिया बेपत्ता झाल्यात त्यांच्यासोबत नेमकं काय झाले ? कुठे असतील ? कशा असतील याचा शोध सरकार घेत नसेल, मीडिया प्रश्न विचारात नसेल, आणि जे स्त्रीची पूजा करतात त्यांच्या जर भावना दुखत नसतील, तर अशा लोकांना माणूस म्हणावे का ? हा प्रश्न समोर उभा राहतो. पोलिसांकडे सर्वाधिकार व यंत्रणा कार्यरत असूनही जर पोलीस त्याचा शोध घेऊ शकत नसतील, आणि लोक एवढ्या महिला बेपत्ता झाल्या कुठेत यासाठी रस्त्यावरील आंदोलन करत नसतील, तर आम्ही गाई विषयी संवेदनशील आहोत परंतु बाई विषयी नाही, हीच दिसून येते. महाराष्ट्राचा जर विचार केला तर मागील तीन महिन्यांमध्ये पाच हजारापेक्षा जास्त महिला बेपत्ता आहेत. महिला बेपत्ता होणे या गंभीर बाबीवर कोणीच चर्चा करत नाही. याचा अर्थ नेमका काढायचा तरी काय ? एका गाईसाठी वादंग निर्माण करणारे लोक बाईसाठी गप्प बसतात. याचा अर्थ त्यांच्या मनामध्ये बाई विषयी संवेदनशीलता, आदर, सन्मान हा राहिलेला नाही. स्त्रीची देवी म्हणून पूजा फक्त धर्म सांगते म्हणून करतात. सन्मान मात्र हेतू पुरस्कार टाळला जातो. हेच आपल्या वर्तनातुन दिसून येते. दिल्ली येथील एका निर्भयासाठी लाखोच्या संख्येने महिलांचे मोर्चे निघालेत, तेव्हा असं वाटलं महिलांच्या समस्येसाठी किमान महिला तरी जागृत आहेत. आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी महिला तरी रस्त्यावर उतरतात. परंतु ही अपेक्षा फोल ठरली. कारण एकीकडे हजारोच्या संख्येने महिला बेपत्ता होतात, त्यांचा कोणताही शोध लागला जात नाही. त्यामुळे मेणबत्ती घेऊन रस्त्यावर आलेल्या महिला, बेपत्ता झालेल्या महिलांविषयी एक शब्द बोलत नाहीत किंवा त्यांच्याविषयी न्याय मागत नाहीत, ही शोकांतिका आहे. दुसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिल्ली येथे लैंगिक शोषणाचे आरोप करून आरोपीला अटक




व्हावी, आरोपीची योग्य ती चौकशी होऊन आरोपीला शिक्षख व्हायला पाहिजेत, परंतु अशी कोणतीही संकेत सरकारकडून दिसत नाहीत. म्हणजे गाई साठी भावनिक होणारे लोक, न्याय हक्कासाठी स्त्रीच्या अस्मितेसाठी जर आवाज उठवत नसतील, उलट पक्षी आवाज दाबणाऱ्याला समर्थन करत असतील, तर महिलांविषयी आदर प्रेम सन्मान हे सर्व बेगडी आहे. व धर्माच्या नावाचा वापर राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी केला जातो हेच सिद्ध होते. गाईला धर्माशी जोडून, गाई साठी लढले जाते, परंतु बाईचा आवाज दाबून बाईला न्यायच मिळू नाही अशी व्यवस्था निर्माण करून, हे सरकार आजही मनुस्मृतीचे पालन करून, महिलेला दुय्यम समजते. हेच यामधून दिसून येते. स्त्री ही जगाची जननी आहे. आणि जगाच्या जननीला न्याय मिळत नसेल, आणि आरोपीला सत्ता मिळत असेल तर सरकार न्यायाचे, जनतेचे नसून धर्माच्या नावाखाली हुकूमशाही निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीचे व मनुस्मृतीचे पालन करणाऱ्या मनवृत्तीचे सरकार आहे. हेच यामधून दिसून येते. महिलांनी महिलांच्या अत्याचारासाठी रस्त्यावर न उतरणे, बेपत्ता महिलांसाठी सरकारला जबाब न विचारणे, हेही राजकीय षडयंत्र आहे असेच समजावे. कारण निर्भया प्रकरणात रातोरात लाखो महिला एकत्र येतात, त्यांना रुमाल मेणबत्ती एका वेळेस पुरवण्यात येतात, परंतु दिल्ली येथील महिलांना आंदोलनासाठी उपलब्ध असलेली वीज सुद्धा कट करण्यात येते. पिण्याचे पाणी सुद्धा बंद केले जाते अशी अवस्था असताना निर्भया प्रकरणात समोर आलेल्या महिला त्या राजकीय उद्देशाने समोर आणल्या होत्या आणि दिल्ली येथील प्रकरणात राजकीय उद्देशांमुळेच समोर येऊ दिले जात नाही. हे स्पष्ट होते प्रधानमंत्रीच्या राज्यांमधून 41 हजार 621 महिला बेपत्ता होतात. याचा जबाब विचारण्याची हिंमत राज्य सरकार व केंद्र सरकारला कुणी दाखवत नाही, याचाच अर्थ आंदोलन, कॅन्डल मार्च ,हे फक्त सरकारच्या हितासाठी केली जातात. सर्वसामान्य व महिलांच्या हिताचे, न्यायाचे, कोणाला काही घेणे देणे नाही. याची प्रचिती यामधून येते. महिलांना न्याय मिळत नसेल यासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर हा खूप चिंतेचा विषय आहे. बेपत्ता झालेल्या महिलांचा शोध लागत नसेल, तर कुठे आहेत कशा आहेत ? कशासाठी बेपत्ता ? झाल्यात याचे कारणे समजत नसतील, तर महिला बेपत्ता होण्यामागे खूप मोठे षडयंत्र असून महिलांसाठी खूप मोठा धोकादाय आहे. व यामध्ये कोणतीही महिला कधीही अडकू शकते. म्हणून भविष्यातील महिला बेपत्ता न होण्यासाठी महिलांनी जागृत, नागरिकांनी समोर येऊन धर्माला महत्त्व न देता, तर कर्माला महत्व देऊ न्याय हक्काची लढाई लढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. व धर्माच्या नावाने राजकारण करून राजकीय पोळी भाजणाऱ्या लोकांना धडा शिकवून त्यांना त्यांची जागा दाखवली, तरच महिला व सर्वसामान्य लोक सुरक्षित होतील.

# हमारा अभियान हर घर-हर मन संविधान




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268

आधुनिक केसरी

**जगाच्या पाठीवर '२०५ पेक्षा जास्त देश' आहेत. पण या सर्व देशांचा आणि त्यांच्या राज्यकारभारांचा अभ्यास जेव्हा तुम्ही-आम्ही करायला सुरुवात करतो, तेव्हा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचा प्रचंड अभ्यास आणि दूरदृष्टीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. एक अतिशय 'वैशिष्ट्यपूर्ण' असं लिखित 'संविधान' ह्या खंडप्राय आणि प्रचंड विविधता असलेल्या आपल्या देशाला लाभलेले आहे. भारतीय राज्यघटनेची महत्वाची 'वैशिष्ट्ये' पुढीलप्रमाणे आहेत:-**

**४) लोककल्याणकारी राज्याचा पुरस्कार :**
लोककल्याणकारी राज्य बनवण्याच्या दृष्टीने 'आयर्लंड'च्या राज्यघटनेवरून प्रेरित 'राज्य धोरणाची निर्देशक ( मार्गदर्शक )' तत्वांचा समावेश आपल्या राज्यघटनेत करण्यात आलेला आहे. राज्यघटनेतील या मार्गदर्शक धोरणांचा उद्देश व्यक्तीचा 'सर्वांगीण विकास' साध्य करुन 'लोककल्याणकारी राज्य' निर्माण करने हाच आहे. धर्म, जात, वंश, प्रदेश असा कोणताही भेदभाव लोककल्याणाच्या बाबतीत न करता प्रत्येक व्यक्तीचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास साध्य करण्याची जबाबदारी शासनाची असल्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

**५) मुलभूत हक्कांचा समावेश :**
प्रत्येक भारतीय नागरिकाला सुखी, समृद्ध व प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे म्हणून, भारतीय राज्यघटनेच्या 'भाग तीन' मध्ये 'मुलभूत हक्कांचा' समावेश करण्यात आलेला आहे. राज्यघटनेतील 'अनुच्छेद १२ ते ३५' हे अनुच्छेद नागरिकांचे मूलभूत हक्क स्पष्ट करतात. घटनाकारांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्या सर्व भारतीयांना समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा, धार्मिक तसेच आपली सांस्कृतिक विविधता जपण्याचे अशे बरेचशे स्वातंत्र्य बहाल केलेले आहेत. कोणी ह्या अधिकारांचे उल्लंघन करत असेल, तर 'न्यायालयात' जावून दाद मागण्याचा देखील अधिकार, हा आपला मुलभूत अधिकार म्हणूनच दिलेला आहे.




**६) मुलभूत कर्तव्यांचा समावेश :**
संविधानाच्या 'भाग-चार ( क )' मधील 'अनुच्छेद ५१-क' मध्ये आपणा सर्व भारतीयांची 'मुलभूत कर्तव्ये' विस्ताराने दिलेली आहेत. संविधानाच्या '४२ व्या घटनादुरुस्ती' नुसार अनुच्छेद-५१ ( क ) हा आपल्या संविधानाचा भाग बनलेला आहे. आपण आपले अधिकार आणि हक्क मागत असतांना देशाप्रती असलेल्या कर्तव्यांची देखील जाणिव ठेवणे महत्त्वाचे आहे. अर्थातच ही संविधानिक कर्तव्ये इमानदारीने पुर्ण करणारेच खरे 'देशभक्त' असतात.

**७) संसदीय लोकशाहीचा स्विकार :**
भारतीय संविधानाने 'संसदीय लोकशाही'चा स्विकार केलेला आहे. संसदीय लोकशाही व्यवस्था 'कायदेमंडळ' व 'कार्यकारी मंडळ' यांच्यातील सहकार्य व समन्वयाच्या तत्वांवर आधारलेली असते. संसदीय शासनव्यवस्थेत 'मंत्रीमंडळाची निवड' कायदेमंडळाच्या ( संसद ) सदस्यांकडून केली जाते. तसेच 'मंत्रिमंडळ' हे कायदेमंडळाला जबाबदार असतात. शिवाय 'राष्ट्रपती' हे नामधारी, तर 'प्रधानमंत्री' हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात. भारतात घटक राज्यांच्या स्तरावर देखील 'संसदीय शासन व्यवस्था' निर्माण करण्यात आलेली आहे. घटक राज्यांच्या स्तरावर 'राज्यपाल' हे नामधारी, तर 'मुख्यमंत्री' हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात.

**८) स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था :**
भारताच्या राज्यघटनेने 'स्वतंत्र व एकात्मिक' न्यायमंडळाचा पुरस्कार केलेला आहे. न्यायमंडळावर दडपण येऊ नये, म्हणून न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय, त्यांचा कार्यकाळ घटनेने निश्चित केलेला आहे. विविध प्रकारचे न्याय मिळविण्यासाठी कोणत्याही दबावापासून मुक्त असणारी न्यायव्यवस्था निर्माण केलेली आहे. एकात्मिक न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च स्तरावर 'सर्वोच्च न्यायालय', राज्य स्तरावर 'उच्च न्यायालय', तर त्याखालील स्तरावर 'कनिष्ठ न्यायालयांची' श्रृंखला असते. या व्यवस्थेत 'केंद्रीय कायदे' तसेच 'राज्य कायदे' दोन्ही प्रकारचे कायदे अंमलात आणले जातात.

क्रमशः...

# मुली बेपत्ता होण्याची आकडेवारी खळबळजनक



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**विदेशी संस्कृतीचा वाढता प्रभाव,बदलती जीवनशैली, बदलतं जीवनचक्र, इलेक्ट्रॉनिक माध्यमतील आक्षेपार्ह बाबीचा बोलबाला, टिव्ही सिनेमा या मधील विकृत आचरण, मोबाईलमध्ये नको नको अहितकारक बाबी,आजुबाजुच वातावरण, या सगळ्यांचे गंभीर परिणाम संस्कारावर होत असल्याने अनेक समाजिक समस्या उदभत आहेत. आणि सध्या तर कहर झाला असंच वातावरण निर्माण झाले आहे. मुली बेपत्ता होत आहेत या बाबतीत वेगवेगळ्या दैनिकात वृत्त वाहिन्या वरून प्रसारीत झालेल्या वृत्तानुसार खळबळ जनक आकडे छापुन येत आहेत.**

मग नेमकं खरं काय आहे. खोटं काय आहे तसंच या सनसनाटी मागिल नेमकं सत्य काय आहे. मग पालकांनी आपल्या मुलींना शिक्षणासाठी नौकरी साठी दुर ठेवायचं धैर्य कसं दाखवायचं असे एक नाही अनेक प्रश्न या निमित्ताने सामाजिक तसंच कौटुंबिक पातळीवर निर्माण होत आहेत. पण या प्रश्नांची उकल होण्या अगोदर हे सगळं जाणीव पूर्वक तर केलं जातं नाही ना अथवा या मागे काही षडयंत्र आहे का एखादी शक्ती कार्यरत आहे का यापैकी नेमकं वास्तव काय आहे. आणि वेगवेगळ्या वृत्तानुसार जर हे खरं असेल तर मग असं का घडतंय कुटुंब म्हणून आपण कुठे कमी पडतोय याच सुद्धा चिंतन आवश्यक आहे. मुली ह्या तशा हळव्या मनाच्या असल्याने कौटुंबिक पातळीवर त्यांच्या सोबत संवाद वाढवला पाहिजे. मुलींना कौटुंबिक पातळीवर वात्सल्य माया आपुलकी जिव्हाळा, कमी पडत आहे का म्हणून त्याचे परिणाम स्वरूप अशा घटना घडत आहेत. हे पण अवलोकन करण्याची आवश्यकता आहे. मागिल कही दिवसात राज्यासह देशातील वेगवेगळ्या राज्यात मुली गायब होण्याची आकडेवारी ज्या पद्धतीने प्रसिद्ध होत आहे. ते चित्र खुप विचित्र विलक्षण आणि अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं आहे. अगदी राज्यनिहाय , जिल्हा निहाय समोर येणारी आकडेवारी पाहुण राज्यात सगळीकडे खळबळ उडाली आहे. पालका वर्गात चिंतेच वातावरण निर्माण झालं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळुन जवळपास पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाली आहेत. एका बाजूला प्रचंड प्रगती होत असताना दुसऱ्या बाजुला सामाजिक पातळीवर अशा परिस्थिती मध्ये अशा सनसनाटी बातम्या प्रसिद्ध होण म्हणजे अंतर्मुख करणारी बाब नक्कीच आहे. पण नेमकं या मध्ये सत्यता आहे का हे सामाजिक पातळीवर तपासुन पाहणं गरजेचं आहे. पण सदर बातम्या पुर्ण पणे अफवा आहेत असंही म्हणता येणार नाही. या मध्ये अंशतः तरी सत्यता नक्कीच आहे. असं गृहीत धरून भविष्यात असं होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. कौटुंबिक तसंच सामाजिक पातळीवर जागृती झालीच पाहिजे. कौटुंबिक वात्सल्य जिव्हाळा हा वाढलाच पाहिजे. मुलींना कौटुंबिक पातळीवर प्रचंड मोठ्या प्रमाणात आपुलकी माया ही मिळाली पाहिजे जेणेकरून बाह्य भौतिक जगाच आकर्षण त्यांच्या मनात वाढीस लागणार नाही. अथवा तशी हालचाल असेल तर तात्काळ क्षणी लक्षात येईल. कौटुंबिक वात्सल्य समोर इतर भौतिक मित्रता हि फार प्रभावी ठरणार नाही अशी आखणी कौटुंबिक पातळीवर असली पाहिजे. तसं पाहिलं तर मानवी मन हे खुप चित्र विचित्र असतं मग स्त्री असो कि पुरूष मुलगा असो कि मुलगी मनाची चंचलता हि खूप प्रभावी असते. मग हेच मन कोंडुन किती दिवस राहणार त्या मनाला कुठे अंकुर दिसला कि ते तिथे उमलत फुलत मग एकदा मन उमल कि परीणामाची तमा असते कुठं आणि कोणाला, मग हा संवाद आकर्षण हे विकोपाला जाऊन नको ते घडत हे सगळं सहज घडत नाही. हीं बर्याच दिवसांची प्रक्रिया असते. संगत कशी आहे हे पण खूप महत्वाचं ठरत. पालक म्हणून आपण आपल्या मुलांच्या सोबत मित्रा सारखे संपर्कात असल् पाहिजे. पालक म्हणून मुलं आपल्याला घाबरतात मग मुलांच्या मनात काय चाललंय याचा अंदाज आपल्याला लागतं नाही. हा अंदाज चुकु देयचा नसेल तर मुलांना अगदी मित्र समजुन त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या पाहिजे. संवाद साधला पाहिजे जेणेकरून जीवनातील अनेक धोके त्यांना समजावले पाहिजे. काहि बाबींची आवश्यकता असली नसली तरी सुद्धा जीवनशी निगडित प्रत्येक बाब हि ज्ञान सदृश पद्धतीने मुलींना समजावली पाहिजे. प्रत्येक बाब त्याचे चांगले वाईट परिणाम त्यांचे गंभीर परिणाम काय असतात या बाबतीत सचेत केलं पाहिजे. या सगळ्या बरोबर संस्कारांचे डोस ज्ञान हे वारंवार पाजलं पाहिजे.

# संदेश

आधुनिक केसरी

**काल अचानक पनवेल गाडीने काही खाजगी कामानिमित्त पुण्याकडे निघालो होतो. गाडीमध्ये प्रचंड गर्दी होती. इतकी की, मोकळा श्वास सुद्धा घेता येतं नव्हता! डोक्यावर गाठोडे घेऊन अनेक आया- बहिणी, त्या गाडीत बसल्या होत्या. जनरल डब्यात प्रचंड गर्दी असल्याकारणाने मी आरक्षित डब्यात दरवाजा जवळ मांडी घालून आपले बस्तान मांडले होते. समोर एक पन्नाशीतील गृहस्थ बसला होता. एकमेकांची विचारपुस झाली.तो हिंगोली जिल्ह्यातील होता. व पुण्यात कोठेतरी वॉचमन म्हणुन कामावर होता.**

गाडी भन्नाट वेगाने पुण्याच्या दिशेने निघाली. पुर्णा माईचा तो विशाल तास पाहुन मनं पुलकित झालं. परभणी स्टेशन आलं. एक तरुण माझ्या जवळ येऊन बसला.त्याच्या डोकीचे अन् दाढीचे वाढलेले केस,सावळा रंग, सडपातळ बांधा त्याचा सुखलेला चेहरा... उद्विग्नता त्याच्या चेहर्यावर स्पष्ट दिसतं होती. ते पाहुन मला राहावले नाही. मी त्याला विचारले," भाऊ कुठलाय ?" त्याने फक्त #मी_परभणीचा एवढंच उत्तर दिलं. नाव ? मी पुन्हा प्रश्न केला. तो उत्तरला,संदेश बहुतेक तो बोलण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याचाकडे एक बॅग व एक थैली होती. थैली पुस्तकाने गच्च भरलेली दिसत होती. थोडा वेळ असाच गेला. गाडी परळीत येऊन पोहचली. तेव्हा तो संदेश थोडा मोकळा वाटला. त्याने मला माझे नाव विचारले. मी उत्तरलो दिपक पूर्णेकर. मी त्याला म्हटलं," काय रिसर्वेशन भेटलं नाही का ?" त्याने माझ्यावर नजर रोखून सांगितले, नाही मी साधे तिकीट सुद्धा काढले नाही. मी थोड अचंबित झालो. विना तिकीट अरक्षित डब्यात प्रवास ? मला परत राहावले नाही मी त्याचे शिक्षण व आता कुठं जात आहे याची विचारपुस केली. तेव्हा तो म्हणाला," मी डबल M.A केले आहे. ५-६ वर्ष नौकरीसाठी प्रयत्न केले पण काही यश आले नाही. घरची परिस्थिती बेताची असल्याने आता घरच्यांच्या जीवावर राहणं आता मनाला पटतं नाही.स्वःताचीच आता लाज वाटते म्हणून पुण्यात जाऊन काही जॉब करायचा व स्पर्धा परिक्षा करण्याचा मानस त्याने माझ्यापुढे व्यक्त केला. त्याचे ते शब्द ऐकून काळजावर सुई बोचल्यासारखे वाटले.मी त्याला विचारले," एकाच वेळी जॉब आणि स्पर्धा परिक्षा कसं होईल. ?" त्याने होईल की असे उत्तर दिले. तेव्हा असमाधानाचा भाव त्याच्या चेहऱ्यावर जाणवत होता. त्याला मी विचारले की, "जर आता टी. सी आला तर तू त्याला काय म्हणणार ?" यावर तो म्हटला," मला जे काही बोलायचं ते बोलेल मी. मी थोडा वेळ तसाच शांत बसलो. गाडीने आता बराच वेग धरला होता. तितक्यात आरक्षित डब्यातून जागेवर बसण्यावरून दोन व्यक्तीमध्ये प्रचंड भांडण होत होते. संपुर्ण डब्यामध्ये त्यांचा गदारोळ ऐकू येतं होता. तितक्यात टी.सी. आला व त्याने तो गोंधळ थांबवला. मग एक-एक करुन तो डबा चेकिंग करत आमच्या सामोरं आला. मी उठून त्याला माझ्या कडील जनरलचे तिकीट दाखवले तेव्हा तो म्हणाला," ये तो जनरल का है, फाईन लगेगा!" मी त्याला विनवणी करुन पुढील स्टेशनवर जनरल डब्यात जातो असे कळवले. तो शांत झाला. मग त्याने आजुन बऱ्याच जणांना तिकीट विचारले बऱ्याच फुकट्या प्रवाशाकडून दंड आकारला. शेवटी त्याने संदेशला तिकीट विचारले. मांडीवर घेतलेली बॅग हातात घेऊन तो उभा टाकला. रेल्वे लातूर स्टेशनवर थांबली होती. त्या दोघांचे संभाषण सुरू झाले होते. टी.सी," कहा जाना हैं ? तो,"पुणे." टी.सी," टिकट बताओ." तो," सर नही निकाला." टी.सी संतापात येऊन म्हणाला," टिकिट क्यूं नही निकाला घर की गाडी है क्या ?" तेव्हा तो काहीच बोलला नाही. तो टी.सी म्हणाला,"कहा से बैठे हो ?" तो,"सर परभणी से. टी.सी. म्हणाला,"500 रू. फाईन भरना पडेगा! ते ऐकून संदेश म्हणाला," सर, मै बहुत पढा लिखा पर काहा पर भी नौकरी नही लगी आब पुणे जा रहा हुं काम के लिये मेरे पास इस कागजात और किताब के सिवा कुच्छ भी नहीं है! तो त्याची थैली दाखवत म्हणाला. त्याची ती फाईल टी.सी ने पूर्णपणे निरखून पहिली अन् फाईल बंद करून त्याचाकडे पाहून हलकेसे हास्य देऊन तो काहीच न बोलता पुढे निघून गेला. टी.सी ची ती पाठमोरी आकृती मला बरेच काही सांगून गेली.अन् तो संदेश त्या सारखे लाखों संदेश आजही जीवनात संघर्ष करत आहेत याची आज मनाला प्रचिती आली. सुशिक्षित बेरोजगारीचा डोंब किती उसळला हे परत एकदा अनुभवले. संदेश तु खुप मोठा हो हीच सदिच्छा... लाखों बेरोजगार संदेश सारख्या तरूणांना एकच सांगण आहे की,खचु नका, आपला दिवस नक्कीच येणार आहे फक्त संघर्षरत रहा.

दीपक पूर्णेकर




# शेती मातीची कविता म्हणजे ' मृदगंध '

आधुनिक केसरी

**माणसाने कितीही प्रगती केली तरी, माणूस शेती-माती पासून कधीच दूर जाऊ शकत नाही. तंत्रज्ञान माणसाला धन- दौलत, सुख-सुविधा मिळवून देईल पण पोट भरण्यासाठी लागणारे अन्न फक्त काळ्या मातीतूनच मिळते म्हणून, काळ्या मातीला कोणत्याच माणसाने कधीच विसरू नये हे सांगताना कवी डॉ.राजेंद्र गवळी म्हणतात. 'चंद्र सूर्य तारे, आले जरी हाती, विसरू नये ती, काळी माती' पण काळ्या माती सोबत कृतज्ञपणे वागणारे शिकून सवरुन शहाणे होऊन कुणब्यालाच फसवायला निघतात. फसवी आश्वासने आणि नुसताच आश्वासनांचा गवगवा, फसव्या जाहिरातीचा दिखावूपणा याबद्दल ते 'कर्जमाफी' या कवितेतून म्हणतात.**

**'साज सारा ही बढाई**
**कर्जमाफी भास आहे'**

माणसं तर माणसं पण माणसांसोबत निसर्गही शेतकऱ्याला साथ देत नाही, त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला येतो. पाऊस वेळेवर आला नाही तर,कोणतेच पीक व्यवस्थित येत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला कुठलेच नियोजन करता येत नाही. एकंदरीतच शेतकऱ्याच्या कुटुंबाची वाताहत होते. पावसाच्या एक थेंबासाठी माती असूसलेली असते. त्याशिवाय मातीत कोंब उगवून येत नाहीत. पावसाच्या एका थेंबासाठी जमिनीची होणारी तगमग व्यक्त करताना कवी डॉ.राजेंद्र गवळी म्हणतात.

**'तळमळे माती एका थेंबासाठी**
**वांझ झाली कुस धरतीची'**

शेतातले पीक सुकले, पाऊस कमी झाला की, शेतकरीही मनाने खचतो त्याला सुकलेली पीकं पाहवत नाहीत, म्हणून शेतकरी विघ्नहर्त्या विठ्ठलाकडे पावसाचे दान पुढील शब्दात मागतो.

**'पावसाचे दान दे रे तू विठ्ठला**
**अंत माझा पाहशी का तू विठ्ठला'**

विठ्ठलाकडे धावा केला की विठ्ठल पावतो, पाऊस येतो आणि पावसासोबत शेतकऱ्याच्या मनामनात मृदगंध पसरत राहतो. शेतकरी अनंदून जातो. माती आड टाकलेले बी उगवून येते. शेत शिवार हिरवेगार होते. गायीगुरांना पोटभर खायला चारा मिळतो. पशुपक्षांचा असा किलबिलाट ऐकून, हिरवी समृद्धी पाहून कवी डॉ.राजेंद्र गवळी यांच्या कवितेतील शेतकरी आनंदून जातो या बद्दल ते म्हणतात.

**'शेतकरी राजा, आनंदली काया,**
**स्वप्नेल फुलोनिया, मनामध्ये'**

दुसऱ्यांच्या आनंदात मनाने फुलून येणारा, आनंदी होणारा शेतकरी आणि स्वतःला विसरून अविचाराने वागणारा इथला माणूस. आंधळेपणाने, अविचाराने वागतो तेव्हा कवी डॉ.राजेंद्र गवळी म्हणतात.

'लढताना अस्तित्वाची लढाई मारुनी स्वत्वाला
बेधुंद बुवांना कसे पोसतात येथे माणसे'

अशाच आशयाच्या 'भरोसा राहिला नाही' या कवितेतून आजचा माणूस कसा वागतो हे सांगितले आहे. माणसाचा फक्त दिखावा, नाटकी वागणे हेच आता माणसाचे वागणे झाले आहे. हे नाटके वागणे कुठेतरी थांबले पाहिजे, असे त्यांना वाटते. 'चीर कातडी अन्यायाची' या कवितेतूनही माणसाच्या मतलबी वागण्यासोबतच माणूस कसा संधी साधूंच्या भुलवण्याला बळी पडत आहे हे ते पुढील शब्दात सांगतात.

**'अंधश्रद्धेचे ते श्रद्धेवर होतात रोज बलात्कार**
**राम रहीम ढोंगी येथे करतात रोज चमत्कार'**

जात, धर्म, पंथ या बेगडी फसव्या विचारांपेक्षा महत्त्वाचा आहे तो विचार टिकला पाहिजे. हे सांगतानाच आई-वडील, बाप, आपली सखी यांच्या संदर्भानेही या संग्रहात कविता आलेल्या आहेत. यासोबतच शेतकऱ्याचा सखा बैल याच्याबद्दल असलेली शेतकऱ्याची कृतज्ञता कवी डॉ.राजेंद्र गवळी यांनी त्यांच्या कवितेतून व्यक्त केलेली आहे. बैल आपल्या धन्यासाठी राब राब राबतो. सुख-दुःखात बैल शेतकऱ्या सोबत असतो. शेतकरी त्याचे मन हलके करण्यासाठी त्याचे दुःख बैलाला सांगत असतो. बैल आणि शेतकऱ्याचे आत्मिक नाते असते, म्हणून बैलांना कोणी ढोरं म्हटलेलं शेतकऱ्याला आवडत नाही. बैल म्हणजे शेतकऱ्याचा आधार असतो. जो शेतात राबून आपल्या शेतकरी धन्याचा संसार तो फुलवत असतो म्हणून कवी त्यांच्याबद्दल म्हणतात.

**'नाही आम्हा**
**तुम्ही ढोरं**
**असे जीवना**
**आधार**
**राब राबुनी**
**पोसता**
**तुम्ही धन्याचा**
**संसार'**

शेतकऱ्याला शेतात राबणे, कष्ट करणे फार महत्त्वाचे वाटत असते. शेतात राब राब राबून,कष्ट करून त्याच्या निढळावरून ज्या घामाच्या धारा टपटपतात. त्या शेतकऱ्याला जणू मोत्याच्या धारा वाटायला लागतात. कारण शेतकरी हा कष्टकरी असतो. तो श्रमालाच ईश्वर मानत असतो. श्रम करण्यात शेतकऱ्याला जो आनंद होतो, तो अवर्णनीय असतो. शेतकरी काळ्या आईचा वारकरी असतो. आपल्या भाळावर निष्ठेने काळ्या मातीचा टिळा लावण्यात शेतकऱ्याला धन्यता वाटत असते. वैशाख वणव्यात तहानेने आसुसलेल्या, उन्हाने तापलेल्या भुईला शांत, तृप्त करण्यासाठी बरसणाऱ्या जलधारांचा जेव्हा वर्षाव होतो. तेव्हा जो मातीला गंध येतो, तो गंध म्हणजे मृदगंध तद्वतच कवी डॉ.राजेंद्र गवळी यांच्या काव्याचा हा काव्यविश्वातील दरवळ मृदगंधाच्या रुपाने कायम दरवळत रहाणार आहे.




त्यांच्या कवितांमधून शेतकऱ्यांचे दुःख, त्यांच्या व्यथा, वेदना शेतकऱ्याला लुबाडणारे दलाल,शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी करणारे व्यापारी अन् या परिस्थितीतही धैर्याने, संयमाने, आनंदाने जीवन जगणारा जगाचा पोशिंदा. जगाच्या कल्याणासाठी विठ्ठलाला पावसाचे दान मागणारा शेतकरी त्यांनी त्यांच्या कवितेतून उभा केला आहे.

डॉ.राजेंद्र गवळी यांच्या कवितेचे पीक जोमदार आणि दमदार येण्यासाठी त्यांच्या कवितेला वाचन, चिंतन मननाचे खतपाणी घातले, तर आणखी बहारदार पीक यायला वेळ लागणार नाही.

**कविता संग्रह**
**-मृदगंध**
**प्रकाशक-नवरत्न प्रकाशन,कुकाना**
**पृष्ठ -६४ , किंमत - १००**

शरद ठाकर, सेलू, जि. परभणी, ८२७५३३६६७५

# गर्भाशय आहे म्हणोनी !

आधुनिक केसरी

एका पाळणाघरात चौकशीसाठी जाणे झाले. साधारणपणे सायंकाळचे साडेसात वाजले होते. तिथल्या ताईंशी बोलायला सुरुवात केल्यावर आतून लहान बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. "अच्छा! पिल्लू आहे आत ? हो. दीड वर्षांचा आहे." त्याचं रडणं सुरूच होतं. का रडतो आहे ? तुमच्या आवाजाने त्याला वाटले की त्याची आई आली आहे. आतल्या दिशेने, "पिलू, अरे तुझी आई नाही आली." माझ्या काळजात धस्स झाले. रडणे अजून सुरूच. "अरे आई नाहीये तुझी. येईल आता." माझ्याकडे पाहत,"उशीर झालाय आईला. सांताक्रूझला बदली झालीय आताच त्याच्या आईची. सरकारी नोकरीत आहे. येईल आठपर्यंत. अजून रडणे सुरूच होते. तेवढ्यात ताई म्हणाल्या, "दाखव गं त्याला त्याची आई नाही ते." आत पाहिले तर एक छोटं गोड पिल्लू मला डोकावून पाहत होतं. त्याचे डोळे आईला शोधत होते. मला पाहून त्याने रडणं थांबवलं. मात्र त्याचा चेहरा नाराज झाला. तो खाली वाकून वाकून माझ्या मागे आई आहे का बघत होता. मला कसंसच झालं. मी त्याला समजू शकत होते. ( मला कबीरची आठवण झाली. त्यालाही मी साधारणपणे दीड/ दोन वर्षांच्या आसपास अधूनमधून पाळणाघरात ठेवायचे. आधी पाळणाघर घरासमोरचा रस्ता ओलांडून होतं. कबीर त्या पाळणाघरात सोडल्यावर रडायला लागला की घरी ऐकायला यायचं. मी लगेच तिथे जायचे. पाहवत नव्हतं त्याला इतकं रडताना. आमची घालमेल आम्ही दोघेच समजू शकत होतो. दुसऱ्या का तिसऱ्या दिवशीच मी त्याला ठेवणं बंद केलं. मी जिथे राहायचे तिथे मुलेच नसल्याने त्याला खेळायला सोबती मिळतील अशा आशेने मी पाळणाघरात ठेवायला सुरुवात केलेली होती. पुढे पुढे ट्रेनिंग घ्यायला जाताना ठेवायची गरज पडू लागली. काही दिवसांनी एक घरगुती पाळणाघर मिळालं. जिथे थोडा वेळ ठेवायला सुरुवात केली. तिथेही कबीरला सोडायला जाताना गाडीवर बसलं की कबीरला कळायचं की त्याला सोडायला नेत आहेत. तो घरापासूनच रडायला सुरुवात करायचा.



लक्ष्मी यादव, मुंबई, मो. 98337 95533

कसं तरी रस्त्यावरच्या गाड्या आणि इतर गोष्टी दाखवत तिथवर नेलं की गाडीवरून उतरायचा नाही. उचलून नेलं की पाळणाघराच्या दरवाज्यात पायांना घट्ट धरून मिठी मारून बसायचा. ते सोडवून त्याला तिथे सोडून येताना जीव तीळतीळ तुटायचा. पाय निघायचा नाही. अम्मा ( बेबी सीटर ) म्हणाल्या, “आपको दिल पे पत्थर रखकर जाना होगा। आप छोड़के खड़ा मत रहो, नहीं तो वो रोयेगा। देखो हम बड़ों को भी नई जगह की आदत लगनेके लिए टाईम लगता है ना। एक हफ्ते तक वो रोयेगा फिर उसको यहाँ की आदत लगेगी तो वो रोना बंद करेगा।“ कबीरला सोडलं की तो पटकन त्यांच्या खिडकीवर चढायचा आणि रडत रडत खिडकीतून इवलेसे हात बाहेर काढून “आई, नको नं ज्यावू, ” म्हणायचा. माझे डोळे घळघळा वाहायचे. मी पळत जाऊन त्याच्या हातांची पप्पी घ्यायची. अम्मा माझ्याकडे पाहायच्या.

मी “मी लवकर येते हं पिल्लू” म्हणायचे आणि गेटकडे तोंड वळवायचे. मागे वळून पाहिलं की तो अजूनही खिडकीतून हात बाहेर काढून रडत असायचा. काळजाचं पाणी पाणी होणं काय असतं ते असं अनेकदा अनुभवलं. मग अम्मा त्याला आत घेऊन जायच्या. मी गाडीवर किती तरी वेळ शांत असायचे. संध्याकाळीही कबीर वाट बघत बसलेला असायचा. मला पाहताच धावत येऊन मिठी मारायचा. खूप पप्प्या घ्यायचा. **क्रमशः**

# सोयगावात चोरटे अवैध गौण खनिज वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

## महसूलच्या भरारी पथकाची धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** शहर परिसरात शासनाचा महसूल बुडवून चोरट्या मार्गाने अवैद्य गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. बुधवारी (दि.१०) सकाळी सोयगाव- बनोटी रस्त्यावर शासकीय गौण खनिजाने भरलेला ट्रॅक्टर सोयगाव तहसील कार्यालयाच्या भरारी पथकाने पकडून तहसील कार्यालयात जमा केला आहे. महसूल विभागाच्या या धडक कारवाईमुळे चोरट्या मार्गाने अवैद्य गौण खनिज माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. सोयगाव व परिसरात शासनाचा महसुल बुडवून जेसीबीद्वारे खोदकाम करून ट्रॅक्टर ने वाहतुकीचे प्रकार वाढले आहेत.दरम्यान बुधवारी सोयगावचे तहसीलदार तालुका तथा दंडाधिकारी रमेश जसवंत व भरारी पथक प्रमुख गोरखनाथ सुरे बुधवारी (दी.१०) सकाळी सोयगाव- आमखेडा रस्त्याने फेरफटका मारण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांना श्याम भास्कर चौधरी यांचे मालकीचे ट्रॅक्टर क्रमांक एम एच २०,सी आर ६२९१ हे शासकीय गौण खनिजाने (मुरूम १ ब्रॉस) भरलेले आढळून आले.त्यास थांबऊन ट्रॅक्टर ड्रायव्हर शाहरूख सिकंदर पठाण यास भरारी पथकाने विचारणा केली असता हे गौण खनिज आमखेडा शिवारातील गट क्रमांक ६२ मधून वाहतूक करीत असल्याचे सांगितले. तसेच त्याच्याजवळ कोणताही महसूल भरण्याचा पुरावा त्याच्याजवळ मिळून न आल्याने तहसील कार्यालयाच्या भरारी पथकाने पकडून तहसील कार्यालयात जमा केलेआहे.

# टाकीत विषारी औषध; चारशे कोंबड्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** कळवण तालुक्यातील बेज शिवारात पोल्ट्री फार्मच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत विषारी औषध टाकल्याने ४०० पक्ष्यांचा (कोंबड्या) मृत्यू झाला असून, हे पाणी पिलेले उर्वरित पक्षी अत्यवस्थ अवस्थेत आहेत. शेतकऱ्याचे एक लाखाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी कळवण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कळवण तालुक्यातील नवीबेज शिवारात हा प्रकार घडला. शेतकरी सचिन रौंदळ यांचा या ठिकाणी पोल्ट्री फार्म आहे. फार्ममधील पाण्याच्या टाकीत रात्री कुणीतरी विषारी औषध टाकल्याने सुमारे पाच हजार पक्ष्यांना विषबाधा झाल्याचे सांगितले जाते. त्यापैकी ४०० पक्षी मयत झाले असून एक लाखाचे नुकसान झाले.

# क्षुल्लक कारणावरून एकाचा भोसकून खून

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील टाकळी राजेराय येथे माझ्या वडलाला दारु का पाझली म्हणत एकाचा चाकुने भोसकून खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी संध्याकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास घडली. बबन कुचे (50) रा.टाकळी राजेराय असे मयताचे नाव आहे. पोलिसांनीसंशयावरून आरोपींच्या वडलाला ताब्यात घेतले असून, दोन मुख्य आरोपी फरार आहेत. दरम्यान मयत बबन कुचे यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरून रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती .बबन कुचे हे आपल्या घरी असताना करण नामदेव बनकर व सुरज (टगा) नामदेव बनकर या दोघे सख्ख्या भावांनी माझ्या वडलाला दारु का पाझली म्हणत बबन कुचे यांच्यावर काठी कुऱ्हाडीने हल्ला केला व नंतर चाकू भोसकुन खून केला. दरम्यान बबन कुचे यांना जख्मी अवस्थेत खुलताबाद येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलिस उप विभागीय अधिकारी मुकुंद आघाव यांनी ग्रामीण रुगणालयात जाऊन मयत बबन कुचे यांची तपासणी केली. दरम्यान या घटनेमुळे टाकळी राजेराय परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# डॉ. संजय राठोड जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** फुले -आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पणच्या वतीने कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी शासकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय राठोड यांना जीवन गौरव पुरस्कार व शाल, पुष्पहार देऊन सत्यशोधक दर्पणचे समाधान वाणी,उमेश नेमाडे, संजय साठे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाळासाहेब वाल्हेकर, उद्घाटक डॉ. संजय राठोड, प्रमुख पाहुणे श्रीमती जयश्री सोनकवडे जाधव (उपायुक्त प्रादेशिक कल्याण कार्यालय औरंगाबाद), श्रीमती नंदा गायकवाड (उपायुक्त मनपा) इंजि. मधुसूदन कांडलीकर (कार्यकारी अभियंता जालना), मा.भीमराव नाडे (अधीक्षक सीजीएसटी) मा. राजू अहिरे (सदस्य जिल्हा नियोजन समिती),प्रा.नारायणराव (पंजाबराव) कोलते पाटील,यांची उपस्थिती होती. फुले -आंबेडकर यांची शैक्षणिक धोरण व आजची शैक्षणिक स्थिती या विषयावर उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात विविध उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, राज्यस्तरीय उत्कृष्ट चित्रकार पुरस्कार, उद्योगरत्न, जीवनगौरव, समाजभूषण व समाज गौरव आदी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय साठे यांनी केले आभार उमेश नेमाडे या कार्यक्रमासाठी संपादक संतोष वाणी, उपसंपादक बाळासाहेब वाघमारे, सहसंपादक गोकुळसिंग राजपूत, संतोष साठे, दीपक बनसोडे, सुमित नेमाडे, नितीन अंभोरे, बबन गायकवाड आदींनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# निराधार वृद्धांना वृद्धाश्रमात मिळाला आश्रय

आधुनिक केसरी न्यूज



**चिखली :** ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली द्वारा संचालित तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे एकच दिवशी चार निराधार बेसहारा निराश्रित वयोवृद्ध पती-पत्नी यांना गोदरीचे सरपंच भरत जोगदंडे यांच्या मदतीने आश्रय मिळाला.

ढसाळवाडी येथील अमृता गायकवाड यांना सात मुली जावई नातवंड असून आई बाबा चि काळजी करीत नही बाबा अर्धांगवायू रोगाने त्रस्त तर आईच्या डोळ्याची शश्रक्रिया झालेली असताना सात मुली पैकी कोणीच देखभाल करायला तयार नाही. तसेच लक्षिमन सोनावणे व सुभाबाई सोनावणे यांचा मुलगा मयत असल्याने देखभाल करायला कोणीच नाही अशा परिस्थितीत या दोघां वयोवृद्ध जोडप्यांची भेट गोदरी चे सरपंच भरत जोगदंडे याच्याशी झाली त्यांनी आपली कथा त्यांना व्यक्त केली असता त्यांना अश्रू अनावर झाले. त्या वृद्धानी आम्हाला आश्रम मध्ये पाठविण्याची विनंती केली. क्षणाचाही विलंब न करता लगेच निराधार वृद्धा ची निशुल्क निःस्वार्थ सेवा करणारे तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर चे संचालक प्रशांत डोंगरदिवे याच्याशी संपर्क केला असता त्या निराधार वयोवृद्ध यांचि व्यथा ऐकून त्यांना तात्काळ वृद्धाश्रमात आश्रय देण्यात आला. यावेळी गोदरी चे सरपंच भरत जोगदंडे, सरपंच भोकर गजानन फोलाने, सुदर्शन कऱ्हाडे, किरण नाईक, भारतीय सैन्यात सेवारत अक्षय डोंगरदिवे, ऋषिकेश चोथमोल, सागर इटकर, स्वप्नील मोरे राजू कऱ्हाडे यांची विशेष उपस्थिती लाभली.



# महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त फुलंब्री नगरपंचायत येथे नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरपंचायत चे अधिकारी कर्मचारी सकल राजपूत समाजाचे मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रूग्णांना फळे वाटप करून बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव काळे :** १० मे रोजी स्वाभिमानी नेता श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस स्वाभिमानी दिवस म्हणून उत्सवात साजरा करण्यात येतो.याच दिवशी वंचित बहुजन आघाडी शाखा पिंपळगाव काळे यांच्या वतीने आरोग्य केंद्र पि काळे येथे रुग्णांना फळ वाटप करून साजरा करण्यात आला. बहुजन समाजाच्या अस्तित्वासाठी ,हक्कासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर साहेब सतत लढा देत असतात त्या अनुषंगाने ग्रामपंचायत पिंपळगाव काळे च्या मा सरपंच्या आशाताई कळस्कार आणि सदस्य अजय भाऊ ताठे यांनी सुद्धा आपली उपस्थिती दर्शविली.

प्रार्थमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव काळे येथे फळ वाटप करतांना उपसरपंच भारती ताई बांगर, श्रीकृष्ण गवई ता उपाध्यक्ष वं ब आ , सुपडा बांगर जिल्हा युवा उपाध्यक्ष वं ब आ. हरिभाऊ वाघमारे सर्कल प्रमुख, महिंद्रा बांगर, श्रीराम भिडे मा सदस्य, गफूर शहा, सादिक मिस्त्री, मंगेश मानकर, सुधाकर सावरकर, रवी अवचार, आकाश बांगर, धम्मसागर गवई, ओम सावरकर,अनिकेत बांगर,उमेश डोंगरदिवे, दीपक रजाने, अमोल गवई आदी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.




# पैठण तालुक्यासाठी ३६ हजार ४२५ मेट्रिक टन खताचे आवंटन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** शेतकरी आता खरीप हंगामाच्या तयारीला लागला असून मागील वर्षीच्या तुलनेत यंदा ऊस व कपाशीचे शेत्र नक्कीच वाढणार आसल्याचा अनुमान कृषी विभागाच्या वतीने सागण्यात आले त्यामुळे शेतकरी शेतीकामे उरकण्याची लगबग सर्वत्र बघावयास मिळत आहे. मागील वर्षी पाऊस समाधानकारक बरसला त्यामुळे यंदाही पाऊस चांगला पडेल या आशेने बळिराजा खरीपाच्या तयारीला लागला आहे . खरिपाची तयारी सुरू असतानाच पैठण तालुक्यासाठी ४३ हजार ४९७ मेट्रिक टन खताची मागणी होती त्यापैकी ३६ हजार ४२५ मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी संदिप शिरसाट यांनी दिली. मागील वर्षी खरीप व रब्बी हंगामात शंभर टक्के पेरणी केली पिकही जोमात आले मात्र शेतकऱ्याच्या पदरी पडण्या आधिच अतिवृष्टीने पिके भुईसपाट झाली त्यामुळे ऊस,कपाशी उत्पन्नात घट झाली. परंतु यावर्षी सध्याही पाणीसाठा उपलब्ध असल्याने उन्हाळ्यात बाजरीचा पेरा वाढला असुन अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांची लागवड केल्यामुळे आता खरिपाच्या पेरणीसाठी जमीन तयार करण्यासाठी शेतकऱ्यांची लगीनघाई सुरू झाल्याचे चित्र तालुक्यात आहे.

एकंदरीत तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र एक लाख एक्केचाळीस हजार हेक्टर असून, यापैकी एक लाख हेक्टरवर खरिपाची लागवड करण्यात येते. ग्रामीण भागात अद्यापही पुरेशी खते उपलब्ध नसल्याने खते खरेदी करताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो . यामुळे बियाणे, खते खरेदीवर कृषी विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.



तालुक्यात खरीप हंगामासाठी मुबलक रासायनिक खतांचा साठा उपलब्ध राहणार आहे . यामध्ये युरिया १२ हजार ८२१ डीएपी २ हजार ७९७ , सिंगल सुपर फॉस्फेट ३ हजार ९८३ , एमओपी १ हजार ४६४ संयुक्त खते १५ हजार ३६१ मेट्रिक टन असे एकूण ३६ हजार ४२५ मेट्रिक टन खतांचे आवंटन २०२३-२४ साठी मंजूर झाले .

**अन्यथा दुकानावर कायदेशीर कारवाई :** पैठण तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी आपल्या दुकानातून एक जूनपूर्वी कापुस बियाण्याची विक्री करू नये . कापूस बियाण्याची विक्री एक जूननंतर करावी तसेच शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया करून लागवड करावी याबाबत सल्ला द्यावा . एक जूनपूर्वी कापूस बियाण्याची विक्री केल्यास संबंधित कृषी सेवा केंद्र चालकांवर कायदेशीर कारवाई केले जाणार असल्याचा इशारा तालुका कृषी अधिकारी शिरसाट यांनी दिला आहे .

# म्हैसमाळ येथे वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश

## खुलताबाद पोलीस ठाणे व दामिनी पथकाचा छापा; तीन आरोपींना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** मराठवाडयाचे मिनी महाबळेश्वर तसेच धार्मिक स्थळ असुन या परिसरात अंबटशोकीन मोठ्या प्रमाणात येत असुन लपूनछपून सचिदानंद होटल वर वेशाव्यवसाय होत असल्याची गोपनीय माहिती खबऱ्याकडुन मिळाली या आधारे पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे व दामिणी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांच्या संयुक्ताने छापा टाकून तीन आरोपींना अटक केली व या छाप्यात १३ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार म्हैसमाळ येथे सचिदानंद या होटेलात वेशाव्यवसाय होत असल्याची माहिती मिळाली असता या होटल वर बनावट गिराइक पाठवुन संध्याकाळी १६ वाजेच्या सुमारास वेशाव्यवसाय होत असल्याची माहिती बनावट गिराइक यांनी देताच या सचिदानंद होटल छापा टाकला. यावेळी आरोपी चंद्रकला भागुजी साठे (वय ५४), रा. म्हैसमाळ, आप्पासाहेब भागुजी साठे (वय २४) रा. सुलीभंजन, महेश अकुंश



भालेराव (वय ३०) रा. म्हैसमाळ या तीन आरोपींना अटक केली असुन मोबाईल फोन, रोख रक्कम इतर साहित्य किमत १३ हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे, देह व्यपार प्रतिबंध सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक धुरधरे महिला कॉ. ढाकणे, पो. महालकर छापा टाकला.

यावेळी खुलताबाद पोलीस ठाण्यात तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.



# वैशाली देशमुख आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन 7 सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत माध्यमिक शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या वैशाली दिनकरराव देशमुख यांना महाराष्ट्र दिनी आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैशाली देशमुख महानगरपालिकेतील उपक्रमशील शिक्षिका आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान हा विषय सोपा करून विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे आणि प्रात्यक्षिकांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग घेणे, वैज्ञानिक संकल्पना विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजून सांगणे या व अशा अनेक बाबी सहज करतात. विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांनी विकासावर त्या भर देतात. मानाचा समजला जाणारा महानगरपालिकेचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे मनपा शिक्षणविस्तार अधिकारी रामनाथ थोरे,माननीय केंद्रीय मुख्याध्यापिका संगिता ताजवे व इतर शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.




# मूर्ती प्राणप्रतिष्ठा, भव्य कलशारोहण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** रत्नाळीकरांचे (धर्माबाद) कुलदैवत आडेली व पोचम्मा मातेच्या मंदिराचे नक्षीदार व भव्य बांधकाम ग्रामस्थांच्या सहभागातून पूर्ण करण्यात आले. बुधवारी (ता.१०) सर्व ग्रामस्थांच्या वतीने अभूतपूर्व अशी आडेली व पोचम्मा मातेची गावातून मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी गावातील महिलांनी डोक्यावर कलश घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यामुळे गावातील वातावरण भक्तिमय झाले होते. सदर मंदिर रत्नाळीच्या शिवारातं पिढ्यानंपिढ्यापासून वसलेलं आहे. गावातील विवाह सोहळा असो किंवा एखाद्या देवदर्शनाला गेलेलं समूह असो ते पहिल्यांदा द्रौपदी माता, पोचम्मा व आडेली मातेचे दर्शन घेऊनच पुढील विधी किंवा कार्यरंभ करीत असतात. मात्र काळच्या ओघात या परिसरात पौर्णिमा जिनिंग प्रेस आली. रस्ते चकाचक झाले. वस्तीने मंदिर वेढले जाऊ लागले आणि मंदिराची इमारत ही जीर्ण होऊ लागली. यामुळे गावकऱ्यांनी आपल्या कुलदैवत असलेल्या जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला. गावातील



तरुणांनी पुढाकार घेऊन लोक वर्गणीतून भव्य नक्षीदार मंदिराची वास्तु उभी केली. हा कलशरोहन व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भव्य व्हावा यासाठी आपल्या गावातील सर्व भगिनींना सहभागी करून घेण्यात आले. आपल्या सासरीहून अनेक बाई लेकी या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी माहेरी आल्या. या सर्व बाईलेकी व रत्नाळीतील महिलांनी जल अभिषेक सोहळा व मिरवणुकीत सहभागी झाल्यामुळे गावचे वातावरण अभूतपूर्व असे श्रद्धेच्या भावनेने न्हाऊन निघाले होते. उर्वरित सर्व पूजाविधित ग्रामस्थांनी सहभाग नोंदवावा असे आव्हान समितीच्या वतीने करण्यात आले.

दि.११/५/२०२३ (गुरूवार) स.८.३० वा. श्री गणपती पूजन,मूर्ती पंचामृत अभिषेक,मंडन अवन,दुर्गा सूत अवन,महाआरती व तीर्थप्रसाद वितरण, सं.६.३० – मूर्ती ध्यानदिवस,पुष्पधिवास, फलधिवास,धूप,गंध,कुंकमर्चना, महाआरती व तीर्थप्रसाद वितरण करण्यात आले.

दि.१२ मे २०२३ (शुक्रवार) सकाळी ८.०० ते ८.३० श्री गणपती पूजन, गर्तान्यास ग्रामदेवता पोचम्मा आणि आडेली माता यंत्र प्रतिष्ठा, हवन होम, दुर्गा हवन,कलानिहास हवन,बलीप्रदान,महापुरणाऊती महाआरती तीर्थप्रसाद वितरण.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# लोणार ते लोणी रोडवर अपघात एक जण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील गंधारी येथील एका ५० वर्षीय दुचाकी स्वराचा स्विफ्ट डिझायर गाडीने धडक दिल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास ही घटना घडली. १० मे लोणार तालुक्यातील गंधारी येथील मोहन सेवा राठोड (वय ५० वर्ष) हे कामा निमित्त लोणार कडे दुचाकीने येत असताना लोणार लोणी रोडवर जांबुल शिवारातील भोपाळे यांच्या शेता जवळ छत्रपती संभाजी नगर कडून कान्हेरी ता. रिसोड जिल्हा वाशीम कडे येणाऱ्या स्वीफट डिझायर भरधाव गाडी ने त्यांना समोरून जबर धडक दिली त्या मध्ये त्यांच्या डोक्याला व हात पायाला मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्या नंतर त्यांना प्राथमिक उपचारा साठी लोणार येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर येथे नेण्यात आले त्या ठिकाणी त्यांना मृत घोषित करण्यात आले मृतकाचे चुलत भाऊ मधुकर रेवासींग राठोड यांच्या फिर्यादी वरून स्विफ्ट डिझायर वाहन क्रमांक एम एच २० एफ वाय ४१६१ विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक फोजदार बन्सी पवार पो का कृष्णा निकम जालिंधर मुंडे करीत आहेत.





# विविध उपक्रमांद्वारे बंसल क्लासेसचे मुख्य प्रवर्तक चंदुलालजी बियाणी यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. 11 मे 2023 रोजी बंसल क्लासेस महाराष्ट्राचे मुख्य प्रवर्तक, राजस्थानी मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक तथा क्यूरिअस किड्स महाराष्ट्राचे मुख्य प्रवर्तक चंदुलालजी बियाणी सर यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये बंसल क्लासेसच्या 34 पेक्षा जास्त शाखांनी वेगवेगळ्या शहरात अन्नदान, फळ वाटप, पाणी वाटप इ. सामाजिक उपक्रम राबविले. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी जय भगवान अनाथ आश्रम येथे बंसल क्लासेस महाराष्ट्राचे स्टेट हेड मा. श्री. विष्णू घुगे सर यांच्या पुढाकाराने अनाथ चिमुकल्यांना अन्नदान व फळ वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे गेवराई येथे मा. श्री. गोविंदजी सारडा यांच्या नियोजनात सहारा अनाथालय परिवार (बालग्राम) या ठिकाणी अन्नदान करण्यात आले. उद्गीर, परभणी शाखेतर्फे जिल्हा व उपजिल्हा सामान्य रूग्णालय या ठिकाणी रूग्णांना फळ वाटप करण्यात आले. अहमदनगर शाखेकडून देखील गरजूंना फळ वाटप करण्यात आले. अशा प्रकारे बंसल क्लासेसच्या 34 पेक्षा जास्त शाखांनी महाराष्ट्रात विविध शहरांमध्ये सामाजिक उपक्रम जोपासत मा. चंदुलालजी बियाणी सर यांचा वाढदिवस साजरा केला. मा. श्री. चंदुलालजी बियाणी यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मीक, राजकीय, वित्त, आरोग्य अशा विविध क्षेत्रात आपली सेवा देऊन अनेक लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत व सहकार्य केलेले आहे. बंसल क्लासेसच्या माध्यमातून मा. श्री. चंदुलालजी बियाणी सर यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शैक्षणिक सेवेचे कार्य पोहोचविले आहे. शून्य टक्के व्याजदराने शैक्षणिक कर्ज, बंसल शिक्षा समृद्धी अभियानाच्या माध्यमातून इयत्ता 5वी ते 10वीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, बंसल लाईव्ह या डिजीटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना नीट व जेईईची तयारी करण्यासाठी प्रति विषय प्रति दिवस 1 रूपया या नाममात्र दरात शिक्षणाची सुविधा बियाणी सरांनी उपलब्ध करून दिली आहे. बियाणी सर यांनी आपले वडील पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या नावे अनेक शहरांमध्ये गरजवंतांसाठी मोफत अन्नछत्र देखील सुरू केलेले आहे. सर राजकीय, सामाजिक, धार्मीक व शैक्षणिक माध्यमातून सातत्याने समाजाला सेवा पुरवत आहेत.

# महिला बस आरक्षणामुळे इतरांना त्रास! नागरिकांमध्ये नाराजी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिंदे-फडणवीस सरकारने काही दिवसांपूर्वी विधानसभेत अर्थसंकल्प मांडला. यावेळी राज्य सरकारने महिलांसाठी मोठी घोषणा केली. महिलांना एसटी प्रवासांत ५० टक्के सूट मिळाली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात ही योजना जाहीर केली त्या दिवसापासून महिलांनी पुरेपूर लाभ घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही घोषणा झाल्यापासून अनेक सण उत्सवामुळे महिलांचा प्रवास मोठ्या प्रमाणाने झाला व त्याच प्रमाणे एप्रिल -मे महिन्यात लग्नाचे सीजन असल्यामुळे महिलांनी ह्या 50% आरक्षणाचा प्रचंड प्रमाणे लाभ घेतला. परंतु या आरक्षणामुळे काही नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त झाली आहे धुळे येथील बस स्थानकावर पुरुषांपेक्षा महिलांचा प्रवास जास्त असल्यामुळे काही पुरुषांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. काहींना बसण्यासाठी सीट उपलब्ध होत नाही तर काहींना उभे राहून लांबचा प्रवास करावा लागत आहे. हा त्रास असाच कायम राहिला तर शासनाला या विषयावर नवीन सोयी सुविधा उपलब्ध होईल अशी नागरिकांची अपेक्षा आहे.



# वाशीममध्ये खासगी बस जळून खाक

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** नागपूरवरून नांदेडकडे जाणाऱ्या खासगी बसला आज पहाटे ४ ते ५ वाजतादरम्यान अचानक आग लागली. प्रवाशांना आग लागल्याचे लक्षात येताच बस रस्त्याच्या कडेला उभी करण्यात आली आणि सर्व प्रवासी बसमधून खाली उतरले. यामुळे जीवितहानी टळली, मात्र बस व इतर साहित्य जळून खाक झाले. प्राप्त माहितीनुसार, नागपूर येथून नांदेडकडे जात असताना खासगी बसने वाशीम शहरापासून जवळच असलेल्या जागमाथा परिसरात अचानक पेट घेतला. प्रवाशांनी तात्काळ चालकाला माहिती दिली. चालकाने बस रस्त्याच्या कडेला उभी केली. सर्व प्रवाशी सुखरूप बाहेर पडले. परंतु, आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण बस जळून खाक झाली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर